RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर  वर्ष ३४ वे  अंक १३१ वा  शनिवार, दिनांक ०९ ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक)  पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26  पृष्ठे - ६  मो:९४२२४७२५०२  किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
▪ संपर्क ▪
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८


# भारताने पाकिस्तानची सहा विमाने नष्ट केली

## ऑपरेशन सिंदूरच्या यशाबाबत हवाई दलाचे प्रमुख एपी सिंग यांचे मोठे विधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतीय हवाई दलाने पाकिस्तानचे मोठे नुकसान केल्याची माहिती हवाई दलाचे प्रमुख एपी सिंग यांनी बंगळुरू येथे बोलताना दिली आहे. ऑपरेशन सिंदूर राबविल्यानंतर दोन महिन्यांनी त्यांनी हा मोठा खुलासा केला आहे. जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र प्रणालीमुळे पाच पाकिस्तानी लढाऊ विमाने आणि हवाई देखरेखेसाठी असलेले एक मोठे विमान नष्ट करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

बंगळुरू येथे १६ व्या एअर चीफ मार्शल एलएम कात्रे मेमोरियल लेक्चरमध्ये भाषण करत असताना एपी सिंग यांनी ही माहिती दिली. तसेच त्यांनी काही फोटोही दाखवले. पाकिस्तानच्या नुकसानाबाबत ही अधिकृत माहिती पहिल्यांदाच समोर आली आहे.

एपी सिंग पुढे म्हणाले की, १० मे रोजी भारताने



पाकिस्तानच्या लष्करी तळांना लक्ष्य केले. तेव्हा जेकबाबाद हवाई तळावरील अमेरिकन बनावटीची एफ १६ विमाने नष्ट करण्यात आली होती.

ऑपरेशन सिंदूरबद्दल बोलताना एअर चीफ मार्शल सिंग म्हणाले, आमच्या हवाई संरक्षण प्रणालीने उत्तम काम केले. आपण अलीकडेच खरेदी केलेली एस-४०० हे उपकरण गेमचेंडर ठरले. या प्रणालीमुळे आपण पाकिस्तानच्या विमानांना दूर ठेवू शकलो. जसे की, त्यांच्याकडे असलेल्या लांब पल्ल्याच्या ग्लाइड बॉम्बला ते वापरू शकले नाहीत. कारण एस-४०० मुले ते जवळपास येऊ शकले नाहीत.

विमानांव्यतिरिक्त आपण मोठ्या संख्येने युएव्ही आणि ड्रोन्सही नष्ट केले. त्यांची काही क्षेपणास्त्रे आपल्या हद्दीत पडली होती. आम्ही त्याचे अवशेष गोळा केले आहेत. या अवशेषांचा अभ्यास सुरू आहे. जेणेकरून ती कुठून सोडण्यात आली, त्यांनी कोणता मार्ग अवलंबला होता. क्षेपणास्त्र सोडणारी प्रणाली कशी आहे आणि त्याची क्षमता किती आहे, याची माहिती आम्हाला मिळू शकेल, असेही एपी सिंग यांनी सांगितले.

# विधानसभेला १६० जागा निवडून देण्याची गॅरंटी, 'त्या' २ जणांची ऑफर; शरद पवारांचा सर्वात मोठा दावा

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत मतचोरी केल्याचे म्हटले आहे. त्यात आता ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही सर्वात मोठा दावा केला आहे. विधानसभा निवडणुकीत १६० जागा निवडून आणण्याची गॅरंटी दोन जणांनी मला भेटून दिली होती असे पवारांनी म्हटले. मात्र पवारांच्या या विधानावर भाजपानेही पलटवार केला आहे.

शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत म्हटले की, विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या, त्यानंतर दिल्लीत मला काही जण भेटायला आले. २ जण होते. महाराष्ट्रात २८८ विधानसभेच्या जागा आहेत. आम्ही तुम्हाला १६० जागा निवडून येण्याची गॅरंटी देतो अशी त्यांनी ऑफर दिली. तेव्हा माझ्या



मनात निवडणूक आयोग याबद्दल काही शंका नव्हती. असे लोक भेटत असतात मात्र मी त्याकडे दुर्लक्ष करतो. या भेटीनंतर राहुल गांधी यांच्यासोबत मी त्या लोकांची भेट घालून दिली. त्या लोकांना जे म्हणायचे होते, ते त्यांनी राहुल गांधींसमोर म्हटले. परंतु राहुल गांधी आणि माझे मत या कामात आपण पडू नये, हा आपला रस्ता नाही. आपण लोकांपर्यंत जाऊ, लोकांचा पाठिंबा मागू, जे निर्णय असेल तो स्वीकारू असे ठरले असे त्यांनी सांगितले. तसेच निवडणुकीच्या पद्धतीबाबत लोकांमध्ये शंका निर्माण होणे योग्य नाही. त्यामुळे राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांची सखोल चौकशी झाली पाहिजे. जे काही दूध का दूध, पानी का पानी झाले पाहिजे हा आमचा आग्रह आहे. आक्षेप हा मुख्यमंत्र्यांबद्दल नाही. आक्षेप निवडणूक आयोगावर घेतला आहे. मग भारतीय जनता पार्टी आणि मुख्यमंत्री नेहमी पुढे येऊन का बोलतात हे समजत नाही. आम्हाला निवडणूक आयोगाकडून उत्तर हवंय, दुसऱ्यांकडून नाही. आमची माहिती चुकीची असेल तर निवडणूक आयोगाने देशाला सांगायला हवे. सत्य समोर यायला हवे. सोमवारी संसदेतील आमचे सगळे सहकारी निवडणूक आयोगावर मोर्चा काढणार आहेत असे शरद पवारांनी सांगितले.

## तिहेरी हत्याकांडांने शहर हादरलं; पत्नीसह दोन चिमुरड्या मुलींना संपवलं, शेजाऱ्यांनी पोलिसांना दिली महत्त्वाची माहिती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीत रक्षाबंधन सणादिवशी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ईशान्य दिल्लीतील करावल नगर भागात रक्षाबंधनाच्या दिवशी तिहेरी हत्याकांडाचा एक खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. मृतांमध्ये एक महिला आणि तिच्या दोन मुलींचा समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह ताब्यात घेतले आणि शवविच्छेदनासाठी पाठवले आणि तपास सुरू केला. आरोपी पतीने कुटुंबाची हत्या कशी केली हे अद्याप कळलेले नाही. दिल्ली पोलिसांकडून याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, आज म्हणजेच शनिवारी, ता ९ रोजी सकाळी ७:१५ वाजता, करावल नगर पोलिस ठाण्यात एका महिलेच्या आणि तिच्या दोन मुलींच्या मृत्यूची माहिती मिळाली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिस पथकाला त्यांच्या खोलीत सुमारे २८ वर्षांची एक महिला आणि तिच्या ७ आणि ५ वर्षांच्या दोन मुली मृतावस्थेत आढळल्या.

# आरोग्य कर्मचाऱ्याचे वेतन दुसऱ्याच्या खात्यावर जमा, लातूर झेडपीतील चौघे निलंबित

**लातूर/प्रतिनिधी :** कर्मचाऱ्याचे वेतन त्रयस्थ व्यक्तीच्या खात्यावर जमा करीत हेराफेरी केल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हा परिषदेच्या सीईओंनी आरोग्य विभागातील चार कर्मचाऱ्यांना तत्काळ निलंबित केले आहे. तसेच संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना नोटिसा बजावल्या आहेत.

जिल्ह्यात ५१ प्राथमिक आरोग्य केंद्र व २५२ उपकेंद्र आहेत. जिल्ह्यातील एका प्राथमिक आरोग्य केंद्रातील एका कर्मचाऱ्याने आपले मासिक वेतन जमा झाले नसल्याची जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे शुक्रवारी तक्रार केली होती. त्याची जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांनी तत्काळ दखल घेऊन संबंधित कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या तपशिलाची पडताळणी केली. तेव्हा संबंधित कर्मचाऱ्याचे वेतन त्रयस्थ व्यक्तीच्या बँक खात्यावर जमा झाल्याचे निदर्शनास आले. त्याची गंभीरपणे दखल घेत प्रथमदर्शनी दोषी आढळलेल्या चौघांना निलंबित करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांच्याकडे सादर केला. सीईओ मीना यांनी सोमवारी चार कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे.

प्रथमदर्शनी जिल्हा परिषदेतील वरिष्ठ सहायक लेखा अधिकारी पवनकुमार वाघमारे यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे निदर्शनास आल्याने सीईओंनी वाघमारे तसेच या प्रकरणात अप्रत्यक्षरीत्या सहभागी असलेले प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरील शाखा सहायक सी. एम. थेटे, एम. बी. राऊ आणि निरंजन पाटील यांनाही निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणात वाघमारे यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे कबूल करीत शासनाच्या खात्यावर १२ लाख ३० हजार ८७० रुपये जमा केले आहेत. या प्रकरणात तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

### चौघांची समिती स्थापन

जिल्ह्यात अशा प्रकारे आणखीन अनियमितता आहे की काय हे पाहण्यासाठी चौघांची समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई होणार आहे. वेतन दुसऱ्याच्या खात्यावर जमा केल्याचे निदर्शनास आल्याने चौघांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. शिवाय, चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे.

**– डॉ. बालाजी शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी.**

# लातूरमध्ये वंध्यत्व निवारणासाठी गर्भपिशवीच्या जन्मजात व्यंगावर मोफत लेप्रोस्कोपी शस्त्रक्रिया

**लातूर/प्रतिनिधी :** गर्भपिशवीच्या जन्मजात व्यंगामुळे गर्भधारणेची समस्या निर्माण झाल्याचे निष्पन्न झाल्यामुळे एका महिलेवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्यामुळे वंध्यत्व निवारण होत असल्याने महिला रुग्ण व नातेवाईकांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला



विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग विभाग, इंडियन असोसिएशन ऑफ गायनेकॉलॉजिकल एंडोस्कोपिस्ट्स (आयएईजीई), फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनेकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (एफओजीएसआय), लातूर ऑब्स्टेट्रिक अँड गायनेकॉलॉजिकल सोसायटी (एलओजीएस) यांच्या संयुक्त विद्यमाने अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, उपअधिष्ठाता डॉ. मंगेश सेलूकर यांच्या मार्गदर्शनाखाली ईगल प्रोजेक्टअंतर्गत एक दिवसीय लेप्रोस्कोपी व हिस्टोरोस्कोपी दुर्बीण शस्त्रक्रिया कार्यशाळा बुधवारी घेण्यात आली.

# दुपारी मुलाने संपवले जीवन, रात्री शेतात आईचाही सापडला पोत्यात पुरलेला मृतदेह!

**रेणापूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील सांगवी येथील एकाने पिंपळफाटा येथे खुल्या प्लॉटमध्ये असलेल्या लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. दरम्यान, मयत व्यक्तीच्या आईचाही मृतदेह गावातील शेतात रात्री ९ वाजण्याच्या सुमारास आढळून आला. पोलिस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षकही घटनास्थळी दाखल झाले आहेत.

सांगवी येथील काकासाहेब विनोद जाधव (वय ४८) यांनी रेणापूर पिंपळफाटा येथील शिवनेरी धाब्याच्या पाठीमागे, गावाकडे जाणाऱ्या पाठीमागच्या रस्त्याच्या बाजूस असलेल्या प्लॉटधील लिंबाच्या झाडाला गळफास घेतल्याची माहिती मयताचा मेहुणा विनायक कोंडीराम जगदाळे (रा. ईटी, ता. रेणापूर) यांनी दिली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन स्पॉट पंचनामा करून मृतदेहास खाली काढले. त्यानंतर काकासाहेब वेणुनाथ जाधव यांचा मृतदेह रेणापूर येथील शासकीय रुग्णालयात विच्छेदनासाठी पाठविण्यात आला. याप्रकरणी रेणापूर पोलिस ठाण्यात नोंद करून तपास विपीन मामडगे यांच्याकडे देण्यात आला. दरम्यान, सांगवी येथे जाधव यांच्या शेतात आई समंदर वेणुनाथ जाधव (७०) यांचा मृतदेह पोत्यात बांधून खड्ड्यात पुरून ठेवलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यामुळे आता पोलिसही चक्रावले आहेत.

गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या काकासाहेब विनोद जाधव याने दुपारी आपल्या आईला शेताकडे नेले होते. घटनेनंतर आईही गायब असल्याची चर्चा सुरू झाली. त्यामुळे ग्रामस्थांनी सांगवी शिवारात असलेल्या जाधव यांच्या शेत परिसरात आईचा शोध सुरू केला. रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास शेतात आईचा मृतदेह खड्ड्यात पुरलेल्या अवस्थेत आढळून आला. याप्रकरणी ग्रामस्थांनी रेणापूर पोलिसांना माहिती देताच पोलिसांचे पथक रात्री १० वाजण्याच्या सुमारास घटनास्थळी दाखल झाले आहे. पंचनामा करून तो मृतदेह विच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे.

वृद्ध आईला शेतात घेऊन गेलेल्या मुलानेच आईचा खून करून तिला खड्ड्यात पुरले असावे, त्यानंतर त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली असावी, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनास्थळी पोलिस अधीक्षक अमोल तांबे, सहायक पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण, पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम, बीट अंमलदार विश्वनाथ गिरी, आदी उपस्थित आहेत. पोलिस याप्रकरणाचा सखोल तपास करीत आहेत.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



तुम्ही कोणत्याही ठिकाणी असा, आता थेट पोलिसांशी व्हिडिओच्या माध्यमातून संवाद साधता येणार...


## चिमटा दयाचा



वृक्षारोपन काळाची गरज आहे !
त्याचबरोबर जोपासना महत्वाची आहे !!
देखावा म्हणजे आपल्याच पायावर कुऱ्हाड मारणे आहे !!

# उत्तरादी मठात राघवेंद्र स्वामी पुण्यस्मरण महोत्सवाचे आयोजन


## ➤ १०,११,१२ ऑगस्ट रोजी धार्मिक कार्यक्रम
## ➤ कार्यक्रमांचा लाभ घ्यावा उत्तरादिमठ मध्व मंडळ यांचे आवाहन



**लातूर/प्रतिनिधी :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लातूर येथील श्री उत्तरादी मठ व श्रीमध्व मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरातील श्री उत्तरादी मठात श्री पूज्य राघवेंद्र स्वामी महाराज पुण्यस्मरण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून १० ऑगस्ट ते १२ ऑगस्ट या तीन दिवशीय महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून याचा भावीक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन लातूर येथील उत्तरादी मठाचे पंडित रघुतम आचार्य जोशी श्री मध्वमंडळाचे अध्यक्ष एडवोकेट श्रीराम देशपांडे यांनी केले आहे

**१० ऑगस्ट रोजी प्रारंभ**

श्री राघवेंद्र स्वामी यांचा ३५४ वा पुण्यस्मरण उत्सव १० ऑगस्ट रोजी प्रारंभ होत असून सकाळीं ६ वाजता गद्य पठण, श्री सुक्त हवन,७.३० वाजता अस्टोत्तर सेवा, पंडीत रामकृष्णाचार्य हलगरकर सकाळी साडेआठ ते साडेनऊ वाजता परब्रम्ह संगीत महाविद्यालय जयप्रकाश हरिदास यांचे भक्ती संगीत,सकाळी साडे नऊ ते साडे दहा हरीश कुलकर्णी





यांचे भक्ती संगीत,त्याच बरोबर १० वाजता पंडित श्रीपाद आचार्य जोशी हलगरकर यांचे प्रवचन, दुपारी ११.३० ते१.३० वाजता मध्व शास्त्र संपन्न पंडीत अनंताचार्य काशीकर यांचे प्रवचन त्यानंतर १.३० वाजता महानैवेद्य व २ ते ३ महाप्रसाद होईल त्यानंतर सायंकाळीं भजन,कीर्तन होईल.

११ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० ते १०.३० पंडित शिवदास देगलूरकर यांचे भक्तिसंगित त्यांच्यासोबत सौ मानसी व्यवहारे (परभणी ) तबला संजय सुवर्णकार (लातूर) साथ देतील १०.३० ते ११.३० पंडित गोपीनाथ आचार्य तुळजापूर यांचे प्रवचन तर दुपारी ११.३० ते १.३० पंडित अनंता चार्य काशीकर यांचे प्रवचन, आरती व महाप्रसाद १.४५ ते ३ वाजता. त्यानंतर सायंकाळी पाच ते सहा सौ स्नेहल अमित आर्विकर लातूर यांचे कीर्तन होईल तर सहा ते सात किरणं भावठाणकर व हरीश खंडेराव कुलकर्णी यांचे भक्ती संगीत पारायण व सायन सेवा होईल.

**समारोप कार्यक्रम**

सकाळीं८.३० ते १०.३० वाजता श्री शशी देशमुख व सौ वृषाली देशमुख कोरडे यांची भक्ती संगीत सेवा त्यानंतर पंडित रघुत्तम आचार्य जोशी यांचे प्रवचन १०.३० ते११ पर्यंत होईल त्यानंतर पंडित काशीकर यांचे प्रवचन होईल श्री राघवेंद्र स्वामी पुण्यस्मरण महोत्सवाचां समारोप १२ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता होईल यावेळी प्रमुख अतिथी म्हणून निलंगा येथील तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांची उपस्थिती राहणार आहे या तीन दिवसीय राघवेंद्र स्वामी पुण्यस्मरण सोहळ्यास भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री उत्तरादी मठाचे पंडीत रघुत्तम आचार्य जोशी श्री मध्व मंडळाचे अध्यक्ष एडवोकेट श्रीराम देशपांडे,सचिव संजय राजहंस, किशोर कुलकर्णी मनोज देशपांडे हरिराम कुलकर्णी प्रवीण देशपांडे भानुदास भातंबरेकर, बाळासाहेब देशपांडे , वसंतराव भेंडे, प्रवीण सौंदत्ती ,धनंजय कुलकर्णी ,ईश्वर कुलकर्णी, सौ संयुक्ता राजहंस सौ मनीषा भातंबरेकर सौ पूजा जोशी, सौ अमिता देशपांडे सौ नभा जोशी यांनी केले आहे

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## स्वदेशी मालाच्या उत्पादनावर प्रेम करा

स्वदेशी मालाच्या उत्पादनावर भर दिला पाहिजे. तरच परदेशीयांचा दबाव कमी होणार आहे. आज अमेरिकेच्या धोरणाबाबत विचार केला तर टेरिफ बाबत भारताचे जेवढे शत्रू आहेत त्यांना कमी टेरीफ आकारला जाणार आहे. भारताला आडचणीत आणण्यासाठी उचलेले पाऊल हे स्पष्ट जाणवत आहे. चीन व पाकिस्तानावर अमेरिकेचे प्रेम दिसून येत आहे. त्यामुळे भारतीय नागरिकांनी वेळीच सावध होऊन स्वदेशी माल उत्पादनावर भर दिला पाहिजे. स्वदेशी उत्पादनावर प्रेम केले पाहिजे. ही बाब दुर्लक्षित केली तर भारतावर अमेरिकेचे वर्चस्व वाढणार आहे. अमेरिका एकीकडे भारताला मित्र म्हणते तर दुसरी कडे अधिक कर लाऊन लुटण्याचा एकप्रकार दिसून येत आहे. भारत ज्यांच्याकडून तेल घेईल त्याला विरोध होत आहे. रशियाकडून तेल घेऊ नये असा दंडक काही कामाचा नाही. रशिया व भारताची मैत्री जुनी आहे. ज्याचे दर परवडतील त्याच्याकडून भारत तेल घेऊ शकतो. भारतावर निर्बंध लावणे योग्य नाही. भारत तसे पाहिले तर स्वयंपुर्ण होताना दिसून येत आहे. अनेक बाबतीत परदेशियावर आवलंबुन न राहाता आपल्या देशात कशा प्रकारे उत्पादन वाढविता येईल याचा विचार केला पाहिजे. भारतीयांनी आता स्वदेशी मालावर प्रेम केले पाहिजे. स्वदेशी मालाची खरेदी म्हणजे भारतात, भारतीयांसाठी उत्पादकांना आर्थिक मदत आहे. भारत आज पर्यंत अनेक बाबतीत प्रगती केली ओह. ही प्रगती अनेकांना पाहवत नाही. चीन असो किंवा पाकिस्तान हे कदापी भारताचे मित्र होऊ शकत नाहीत. भारताला कशा प्रकारे आडचणीत आणावयाचे याचाच विचार करीत असतात. अमेरिका बांगला देशाला मदतीसाठी टेरीफचा आकार कमी लावला आहे. भेदभाव धोरण एक ना एक दिवस अमेरिकेला खड्ड्यात घालणारे आहे. भारताला अधिक आर्थिक त्रास व्हावा याच उद्देशाने अमेरिकेची वाटचाल दिसून येत आहे. अमेरिका म्हणते, एक ना एक दिवस पाकिस्तानकडून तेल खरेदी करावे लागेल. मुळात पाकिस्तानात तेलाच्या विहीरी असल्यातरी ते साठविण्याची आर्थिक क्षमता नाही. तो या बाबत स्वयंपुर्ण होऊ शकत नाही. आज पाकिस्तानची आर्थिकस्थिती हालाकिची आहे. केवळ अमेरिका मदत करीत आला आहे. अमेरिका असो किंवा चीन हे आपल्याच स्वार्था साठी मदत करीत आहेत. पाकिस्तानसाठी नाही ही बाब पाकिस्ताने लक्षात घेतली पाहिजे. एक असा दिवस येईल अमेरिका हा काही देश गिळंकृत करण्यासाठी वाटचाल असणार आहे. भारतात अनेक कंपन्यांना केंद्राने चालना देऊन भारतीय बनाटीचे उत्पादन करावे. जे परदेशातून मागवावे लागते. ज्या बाबी आयात कराव्या लागतात त्याचे उत्पादन केले पाहिजे. आजही भारत काही बाबतीत परवलंबी आहे. बॅटऱ्या असो किंवा सौर ऊर्जाचे किटस् असोत हे परदेशातून मागवावे लागतात. मुळात भारतात खनीज संपत्तीचा तुटवडा असू शकतो. काही बाबतीत परावलंबीपना आहे ही वस्तूस्थिती आहे. परवलंबपनाचा कलंक पुसण्यासाठी स्वयंपुर्ण बनले पाहिजे. भारतीय कुटीर उद्योगांना चालना दिली पाहिजे. काही बाबतीत भारताची क्षमता मोठी आहे. आंतराळात संशोधन केले जात आहेत. अनेक अंतरिक्षामध्ये यान सोडले जात आहेत. अशा स्थितीत भारत मागे नाही. काही वर्षात भारताने केलेली प्रगती अनेकांना देखवत नाही. ही बाब लक्षात घेता आज कधी नाही ते खुळ डोक्यात शिरल्याने टेरीफच्या माध्यमातून अधिक कर लावुन आर्थिक पिळवणुक करण्याचा डाव आहे. तो भारतीयांनी हाणून पाडला पाहिजे. भारतीयांनी एकजुट होऊन अमेरिकेला एकजुटीचे सामार्थ्याचे दर्शन घडविले पाहिजे. तरच अमेरिका घाबरणार आहे. नसता वरचेवर निर्बंध व जाचक कर लाऊन आर्थिकदृष्ट्या पिळवणुक करणार यात शंका घेण्याचे कारण नाही. रशियावर अमेरिका जळतो आहे. रशिया तसा सामर्थवानदेश आहे. अनेक बाबतीत प्रगती केली आहे. रशिया हा भारताचा जुना मित्र आहे. अनेकदा भारताला मदतीसाठी धावुन आला आहे. अशा स्थितीत भारताने रशियाची साथ सोडणे योग्य नाही. आज पर्यंत भारताने रशियाच्यामदतीने प्रगती बरोबर व्यापारी संबंध दृढ केले आहेत. मुळात ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर भारताला मित्र मानत असताना मध्येच टेरिफ म्हणजे अधिक कर लावण्याचा जो प्रयत्न केला आहे तो भारताला नमविण्यासाठी आहे. भारतीय नागरिक अमेरिकेच्या दबावाखाली राहावे हाच प्रांजल हेतू दिसून येत आहे. त्यामुळे भारतीयांनी आता स्वयंपुर्ण, स्वावलंबी बनले पाहिजे. आता सणाचे दिवस आहेत. चीन मधून अनेक वस्तू विक्रीसाठी भारतात आयत केल्या जातात. यावर बहिष्कार घातला पाहिजे. चीनी माल स्वस्त असला तरी याचा लाभ चीनला होतो. आपल्या घरी बनविणारे आकाशीदिवे असो किंवा पणत्या असोत, ते स्वदेशी असल्या पाहिजे. भारतीय ग्रामीण भागात आता दर्जेदार उत्पादने होत आहे. महिला बचत गटाकडून अतिषय उत्तम प्रकारे उत्पादने होत आहेत. काही मालाला जागतिक बाजारपेठ मिळत आहे. ग्रामीण भागातील कुटीर उद्योग व हस्तकेलेला प्राधान्य दिले पाहिजे. चीन पेक्षा हस्तकलेच्या वस्तू आकर्षक दिसतात. भारतीयांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. आज परदेशियवस्तुंचे आकर्षन भारतीयांत अधिक आहे. वास्तविक भारतीय बनावटीच्या वस्तू ह्या आकर्षक व टिकाऊ राहातात. चायना मेड माला बाबत म्हण आहे.. चायना माल घरी जाई पर्यंत राहीना! त्यामुळे भारतीय बनाटीचा माल सर्वांनी खरेदी केला तर परदेशिय कंपन्याची नशाच उतरणार आहे. आज जागतिक बाजारपेठेत भारतीय मोठे खरेदीदार आहेत हे मान्यच केले पाहिजे. त्यामुळे भारतीयांनी जर अमेरिकेची नशाच उतारवयाची झाली तर स्वदेशी मालाचा वापर केला पाहिजे. परदेशिय मालावर बहिष्कार घातला पाहिजे. तरच भारताची मान व शान कायम राहाणार आहे. नुकतेच ऑपरेशन सिंदुर यशस्वी राबऊन भारत क्षणात करू शकतो हे जगाला दाखविले आहे. त्यामुळे भारतीयांनी स्वदेशी उत्पादन व मालावर प्रेमकरावे, उत्पादन करावे व वापर करावा.

# पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी पूर्व नियोजन महत्वाचे- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पायाभूत सुविधा विकास प्रकल्प कार्यशाळेचे उद्‌घाटन

**पुणे/प्रतिनिधी:** पूर्व नियोजन, कालमर्यादा, पारदर्शकता, गुणवत्ता आणि विविध विभागांच्या समन्वयाच्या माध्यमातून राज्यातील पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांची गतीने उभारणी करून सर्व यंत्रणांनी एकत्रितरित्या एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी येथे आयोजित पायाभूत सुविधा विकास प्रकल्प प्रशिक्षणाचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, 'मित्रा' संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, मुख्य सचिव राजेशकुमार, प्रधान सचिव अश्विनी भिडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्याच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल एक ट्रिलियन डॉलरकडे सुरू आहे. ही वाटचाल अधिक गतीने होण्यासाठी राज्यात पायाभूत सुविधा विकास प्रकल्प महत्वाचे आहेत. पूर्व नियोजनाच्या माध्यमातून असे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासोबत त्यांची गुणवत्ता व उपयोगिता वाढते. राज्याने रस्ते, रेल्वे, पूल, भुयारी मार्गासह विविध अभियांत्रिकी प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत. त्याचा समृद्ध अनुभव आपल्या गाठिशी आहे. प्रकल्पांच्या उभारणीत गतिशक्ती, जिओ डेटासारख्या सुविधा उपलब्ध आहेत. शासनाच्या विविध विभागांकडे डेटा उपलब्ध आहे, त्याचा उपयोग करून घेण्यासाठी विभागांमध्ये



समन्वय महत्वाचा आहे. त्याबरोबरच नियोजनासाठी क्षेत्रीय पाहणी आवश्यक आहे. असलेल्या माहितीचा योग्यवेळी उपयोग करून विकासप्रकल्पांना चांगली गती देता येते.

दर्जेदार प्रकल्पनिर्मितीचे उद्दीष्ट ठेवून काम करा

प्रकल्पांसाठी विकासक निवडताना त्याच्या क्षमतांचा विचार करणे गरजेचे आहे. प्रकल्पाचे करार करताना राज्याच्या हिताच्यादृष्टीने सूक्ष्म अभ्यासाद्वारे त्यात आवश्यक सर्वच बाबींचा समावेश करायला हवा. प्रकल्प पूर्ण होत असताना काम गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार होत असल्याची खात्री करून त्याचे वेळोवेळी पर्यवेक्षण होणे आवश्यक आहे. भूसंपादनाअभावी प्रकल्पाची किंमत वाढू नये यासाठी भूसंपादन वेळेत पूर्ण होईल आणि त्याचा मोबदला वेळेवर अदा होईल याची दक्षता घ्यावी. भूसंपादन पूर्ण झाल्यावर प्रकल्पाची सुरूवात करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

विविध कारणांसाठी विकास प्रकल्पांच्या उभारणीत येणाऱ्या अडचणी दूर करण्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचे नमूद करून ते म्हणाले, राज्य शासनाने महत्वाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी वॉर रूम कार्यान्वित केली असून त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. राज्यात विविध प्रकल्प वेळेत आणि दर्जेदार निर्माण झाल्यास संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांचेही कौतुक केले जाते, ही बाब आपण लक्षात ठेवली पाहिजे. वित्त पुरवठ्यासाठी विविध पर्याय उपलब्ध आहेत. या सर्व पर्यायांचा विचार करून अधिकाधिक पायाभूत सोयीसुविधांचे प्रकल्प हाती घेता येतील, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

पायाभूत सुविधा प्रकल्प हे महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचा कणा-उपमुख्यमंत्री अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पायाभूत प्रकल्प हे विकसित महाराष्ट्राच्या वाटचालीत महत्त्वाचे पाऊल असून विकसित राज्याच्या विकासदृष्टीचे आणि धोरणाचे साक्षीदार आहेत. विकसित महाराष्ट्र ही एक चळवळ असून पायाभूत सुविधा विकास हा त्यातील केंद्रीय घटक आहे. त्यामुळे रस्ते, पूल, बंदरे, ऊर्जा प्रकल्प, नदी पुनरुज्जीवन प्रकल्प असे अनेक पायाभूत प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी सर्वांनी उच्च क्षमतेने काम करावे. राज्यात सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामधील अडचणी दूर होऊन कामांना गती मिळावी या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, पायाभूत सुविधा प्रकल्प हे महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचा कणा आहेत. या प्रकल्पांमुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. राज्यातील महत्वाकांक्षी प्रकल्पांची गतीने अंमलबजावणी करण्यासाठी वॉर रूमची स्थापना करण्यात आली असून दर दोन महिन्यांनी कामांचा आढावा घेण्यात येतो. महाराष्ट्राने नेहमीच देशाला दिशादर्शक काम केले आहे. राज्याची ही ओळख कायम ठेवतांना पायाभूत सुविधा प्रकल्प अंमलबजावणीची क्षमता वाढविण्यासाठी कार्यशाळा निश्चितच उपयुक्त आहे. या माध्यमातून नवनवीन कौशल्य, दृष्टीकोन विकसित होईल आणि ते क्षमता वृद्धीसाठी महत्वपूर्ण पाऊल ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी व्यक्त केला.

'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनी राज्यातील पायाभूत सुविधा विकास प्रकल्पासाठी उपलब्ध असलेल्या निधीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. उपलब्ध निधी वेळेत खर्च होईल व प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण होतील याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले, पायाभूत सुविधा प्रकल्प वेळेत पूर्ण न होण्याच्या कारणांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यासाठी पायाभूत प्रकल्पाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे. प्रकल्पांच्या कामाचे नियोजन करताना सर्व अडथळ्यांची पूर्वकल्पना असणेही आवश्यक आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन पायाभूत सुविधा क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम केल्यानंतरच पूर्ण होईल. त्यासाठी अधिकाऱ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन प्रकल्प वेळेत पूर्ण करावीत असे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेनंतर राज्यातील प्रकल्पांना गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात प्रधान सचिव श्रीमती भिडे म्हणाल्या, पायाभूत प्रकल्पाची गतिशील अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्याचे महाराष्ट्राचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास महत्त्वाचा आहे. राज्यातील विकास प्रकल्प वेगाने पूर्ण होण्यासाठी विचारांचे आदान-प्रदान होणे आवश्यक असून त्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले. त्यांनी दोन दिवसीय कार्यशाळेतील कार्यक्रमाविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाला राज्यातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# कु.श्रीजाचा वाढदिवस मातोश्री वृद्धाश्रमात उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी:** रेणापूर तालुक्यातील रामवाडी (खरोळा) येथील सामाजिक कार्यकर्ते,भाजपा युवा मोर्चाचे माजी तालुका अध्यक्ष नरसिंग अनिल येलगटे यांची एकुलती एक कन्या कु. श्रीजा हिचा वाढदिवस मातोश्री वृद्धाश्रम येथे साजरा करण्यात आला.

गेल्या १७ वर्षापासून कु . श्रीजाचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम घेवून साजरा करण्याचे काम नरसिंग येलगटे यांनी केले आहे. समाजाला दिशा देण्याचे काम त्यांच्या हातून होत असताना यापूर्वी कु. श्रीजाच्या वाढदिवसानिमित्त सर्व रोग निदान शिबिर, विद्यार्थ्यांना टूथपेस्ट व ब्रश, मेडिक्लोर, हात धुण्यासाठी साबण, वह्या -पुस्तक, पेन, वृक्ष लागवड आदी समाजपयोगी उपक्रम राबवून केला जात असे. अनेक दिवसांपासून श्रीजाची इच्छा होती की माझा वाढदिवस मातोश्री वृद्धाश्रम येथे साजरा व्हावा. हा तिचा संकल्प आजच्या वाढदिवसानिमित्त औचित्य साधून पूर्ण करण्यात आला.

लातूर येथील मातोश्री वृद्धाश्रमात आजी- आजोबासोबत स्नेहभोजन आयोजन करून समाजाला दिशा देणारा आपल्या कन्येचा वाढदिवस येलगटे यांनी साजरा केला.

प्रत्येक जण वाढदिवस साजरा करतो पण नरसिंग गेलगटे यांच्या कन्येच्या वाढदिवसाच्या माध्यमातून समाजाला काहीतरी वेगळी दिशा देण्याचा मानस दिसतो.

यावेळी वृद्धाश्रमातील सर्व आजी आजोबांनी आणि उपस्थित मित्र मंडळींनी श्रीजाला दीर्घ आयुष्य लाभावे, आयुष्यात खुप मोठं व्हाव यासाठी शुभाशीर्वाद दिले.

या कार्यक्रमास अनिल येलगटे, दैवशाला येलगटे, रूपाली येलगटे, दत्ता सरवदे, महेश गाडे, बाळू लखनगिरे, सुधाकर दहिफळे, श्रीकांत धर्माधिकारी, वसंत कातळे, दत्तात्रय शिंगडे, गोकर्णा शिंगडे, राहूल मोटेगावकर, हरिदास पांचाळ, विजय



कुलकर्णी, संतोष शेरीकर, दिनेश भंडारे, वैभव कुलकर्णी, मैथिली मोटेगावकर, सुप्रिया भदाणे, सृष्टी दाभाडे, सायली नराळे, संस्कार शिंगडे, प्रसन्न शिंगडे यांच्यासह मातोश्री वृद्धाश्रमातील सर्व कर्मचारी, मित्र मंडळी उपस्थित होते.

# स्नेहाचे ऋणानुबंध चिरकाल टिकावेत : रक्षाबंधन !

श्रावणमास पर्व हे समाज जीवनाचे प्रतिबिंब आहे. रक्षाबंधन हे एक सामाजिक व धार्मिक पर्व आहे. हे पर्व सामाजिक परंपरेमध्ये सद्भाव, स्नेह, आत्मियता, बंधुभाव, कौटुंबिक एकात्मता यांचा प्रवाह निर्माण करणारे आहे. खऱ्या अर्थाने संस्कृतीला समृध्द बनविणारे, आध्यात्मिक स्पर्शाने जनमनाला पुलंकित करणारे पर्व आहे, रक्षाबंधन पर्व! राणी कर्णावतीने आपल्या रक्षणासाठी हुमायुँ राजाला भाऊ मानून बांधलेली राखी इतिहासाच्या पानावर कोरल्या गेली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील स्नेह व एकी निर्माण करणारी ही जीवंत साक्षच आहे. 'स्त्री' जातीच्या रक्षणासाठी धर्म, जाती, लिंग या भेदांना छेदून पुढे टाकलेले एक पाऊल आहे हे! राष्ट्रीय एकात्मेला पोषक व वर्धक प्रसंग समाजात सद्भावना व सत्प्रवृत्तींचे पोषण करण्याचे कार्य करतात. आपल्या भाऊरायाला बहीण राखी बांधते व आपल्या रक्षणाची अप्रत्यक्षरीत्या हमी घेते. हिंदू संस्कृतीतील समाजमुल्यांचे पोषण करणारी ही सामाजिक परंपरा आजही मोठया दिमाखाने देशात सर्वत्र नांदतांना दिसत आहे.

हिंदू पौराणिक कथेनुसार, महाभारतात, जे एक महान भारतीय महाकाव्य आहे, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान श्रीकृष्णाच्या मनगटामधून वाहणारे रक्त थांबवण्यासाठी तिने तिच्या साडीचा कोपरा फाडून त्याच्या मनगटावर बांधला. त्यामुळे भगवान श्रीकृष्ण यांच्यात एक बंध निर्माण झाला आणि द्रौपदीचे रक्षण करण्याचे वचन त्यांनी तिला दिले. राखी बांधताना बहिणीने म्हणावे, ''येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः। तेन त्वामनुबध्नामि रक्षे मा चल मा चल'' (दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होती तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे)

रक्षाबंधनाची सुरुवात केव्हा झाली, याबद्दल निश्चित पुरावा नाही; पण त्याविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी




देवदानवांच्या युद्धात दानवांच्या शक्तीपुढे देवांचे काही चालत नसे. दानवांचा राजा वृत्रासुर याने देवांचा राजा इंद्र याला युद्धाचे आव्हान दिले. इंद्र आपले वज्र घेऊन युद्धास निघाला. त्या वेळी इंद्राला विजय मिळावा म्हणून त्याची पत्नी शुची हिने विष्णूकडुन मिळालेला एक दोरा (राखी) इंद्राच्या हातावर बांधला. त्या राखीच्या प्रभावाने इंद्राला त्या युद्धात विजय मिळेल, अशी तिची श्रद्धा होती. शेवटी श्रध्दा खरी ठरली आणि इंद्राचा विजय झाला आणि त्याचे गेलेले वैभव परत मिळाले. या प्रसंगाची आठवण म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत पडली, असे सांगितले जाते.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला 'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो. हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पौर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हणले आहे. या विधीस 'पवित्रारोपण' असेही म्हणतात. भावाचा उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते. उत्तर भारतात हा सण राखी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून ''भावास दीर्घ आयुष्य व सुख लाभो मिळो'' अशी कामना करतात.

राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतः ला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण करण्याचे वचन देणे. काही प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना, आणि पत्नी नवऱ्याला राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाचे वचन घेणे हीच यामागची भावना आहे. भारतीय समाजात ऐक्य आणि प्रेमभाव वाढीस लागावा यासाठी रक्षाबंधनाचा सण राजपूत लोकांत रूढ झाला. आजकाल मात्र बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणून हा सण साजरा होतो. या दिवशी बहिणी आपल्या सख्ख्या भावाच्या हातावर राखी बांधतातच आणि शिवाय त्या बंधुत्वसमान नाते असलेल्या व्यक्तीसही राखी बांधतात.

उत्तर भारतातील ग्रामीण भागांत जिथे अनेक खेड्यांमध्ये बहिर्विवाह पद्धती प्रचलित आहे, तिथे मोठ्या संख्येने विवाहित हिंदू स्त्रिया दरवर्षी त्यांच्या पालकांच्या घरी सणासाठी परत जातात. त्यांचे भाऊ, जे विशेषतः पालकांसोबत किंवा जवळपास राहतात, कधीकधी त्यांच्या बहिणींच्या विवाहित घरी त्यांना परत घेऊन आणण्यासाठी जातात. अनेक तरुण विवाहित स्त्रिया त्यांच्या जन्माच्या घरी काही आठवड्यांपूर्वी येतात आणि समारंभ होईपर्यंत राहतात. भाऊ हे बहिणीचे सासर आणि माहेर यांच्यामध्ये आजीवन मध्यस्थ म्हणून काम करतात. शहरी भारतात जिथे कुटुंबे अधिकाधिक विभक्त होत आहेत, तिथे हा सण अधिक प्रतीकात्मक बनला असला तरीही तो खूप लोकप्रिय आहे. या उत्सवाशी संबंधित विधी त्यांच्या पारंपारिक प्रदेशांच्या पलीकडे पसरले आहेत. तंत्रज्ञान, स्थलांतर, चित्रपट, सामाजिक संवाद, आणि हिंदू धर्माच्या राजकीय प्रचाराद्वारे या सणाचे स्वरूप बदलले जात आहे. रक्ताचे नाते नसलेल्या स्त्रिया आणि पुरुषांमध्ये स्वैच्छिक नातेसंबंधांची एक बदललेली परंपरा देखील आहे. यासाठी जाती आणि वर्गाच्या पलीकडे, तसेच हिंदू आणि मुस्लिम हा भेद विसरून राखी बांधली जात आहे.



**प्रविण बागडे**
नागपूर, मो. ९९२३६२०९१९

जैन परंपरेमध्ये सातशे मुनींवर दृष्ट प्रवृत्तीने केलेल्या उपसर्गाला दुर करण्याचे कार्य या पर्वमध्ये झाले. जैन लोक रक्षाबंधनाच्या दिवशी जैन मंदिरात जाऊन अभिषेक-पूजन करुन मुनीं प्रती हृदयभाव ठेवून पंडित-पुजाऱ्यांच्या हस्ते राखी बांधून हे पर्व साजरे करतात. धर्मरक्षणाचे चक्‍ कण आहे ते ! प्रथम धार्मीक व नंतर सामाजिक दायित्व पार पाडले जाते. हे पर्वधर्म व धर्मालय यांच्येशी मातृत्व भावनेतून जोडणारे आहे. संस्कृती व धर्म समर्पणाच्या भावनेला वृध्दिगत करणारे आहे. श्रमण संस्कृतिमध्ये रक्षाबंधनाचे आगळे वेगळे वैशिष्ठ्य आहे. ईश्वरप्रती समर्पणाची भावना व संस्कृतिचा अत्यंत आदरया भावनांना श्रेष्ठस्थान दिले गेले आहे. सामाजिक दृष्टिकोनातून रक्षाबंधन हे वात्सल्य व बंधुभावाचे परिपाक पर्व आहे. बंधुभाव व स्नेहवर्धनाचे पाठया पर्वामुळे गिरविले जातात. समाज व धर्म या पेक्षाश्रेष्ठ आहे राष्ट्रधर्म ! म्हणून सामाजिक व धार्मीक अस्तित्व टिकविण्याची आज राष्ट्राचे अस्तित्व टिकविण्याची, त्याचे जतन करण्याची गरजभासत आहे. ही महान जबाबदारी आज आपणांवर आहे. ती नेटाने करणे गरजेचे आहे, त्यामुळेही घडी नीट घट्ट बसेल. आलमगीर बादशहा दिल्लीवर राज्य करीत होता. त्याच्या प्रधानाने कट आखून बादशहाचा खून केला व प्रेत नदीत टाकून दिले. एका स्त्रिने ते पाहिले. प्रेत वाहून जाऊ नये म्हणून तिने प्रेत पाण्याबाहेर काढले आणि प्रेताचा वाली येईपर्यंत प्रेताजवळ बसून राहिली. बऱ्याच वेळानंतर बादशहाच्या शोधात सैनिक तेथे आले. बादशहाचा मुलगा शहाआलम याने त्या हिंदू स्त्रीचे आभार मानले. तिला आपली बहीण मानले. ती हिंदू स्त्री पुढे दरवर्षी शहाआलमला राखी बांधू लागली. ही प्रथा पुढे अकबरशहा व बहादूरशहा यांनीही चालू ठेवली. इतिहासात याचा उल्लेख आहे. मुघल बादशहानी पवित्र मानलेला हिंदूंचा हा एकमेव सण आहे.

या श्रावण पौर्णिमेला 'पोवती पौर्णिमा' असेही म्हणतात. कापसाच्या सुताच्या नवसुती (नऊ धाग्यांची जुडी) करून तिला आठ-बारा किंवा चोवीस गाठी मारतात व त्यांच्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, महेश, ओंकार, सूर्य इत्यादी देवतांचे आवाहन करून हे पोवते प्रथम देवास वाहून नंतर तसलीच पोवती कुटुंबातील माणसांच्या मनगटावर बांधली जातात. रक्षाबंधनाच्या निमीत्ताने पर्यावरणाचे रक्षण, ऑलिम्पिक खेळाडूंना शुभेच्छा आणि स्त्रीभृणहत्या रोखण्याचा संदेश राखीच्या माध्यमातून करण्याचा निर्धार भाऊ-बहिण आणि समस्त भारतीयांनी या नाजुक पर्वावर केला पाहिजे. रक्षाबंधन निमित्त सर्व बंधु-भगिनींना मन:पूर्वक शुभेच्छा!

# राखी परंपरेची आधुनिक रंगत



श्रावणातील महत्त्वाचा आणि सगळ्यांचा आवडता सण रक्षाबंधन. रक्षाबंधन म्हणजे बंधनाचं नातं, प्रेमाचं प्रतीक आणि आनंदाचा उत्सव. प्रत्येक भावाबहिणीच्या नात्यात गोडवा आणणारा हा सण फॅशनसुद्धा सजवतो! या सणात प्रत्येक स्त्रीया नटायला आणि खास कपडे परिधान करायला उत्सुक असतात. साडीपासून ते इंडो-वेस्टर्नपर्यंत, पारंपरिक दागिन्यांपासून फ्यूजन लूकपर्यंत... आजच्या ट्रेंडमध्ये राखीसाठी खास फॅशनचे रंग खुलत आहेत.

हेवी दुपट्टा

एखादा गडद रंगाचा ड्रेस तुम्ही घेतलात आणि भरलेला दुपट्टा असेल, तर त्यावर तुमचा लूक छान दिसतो. रक्षाबंधनसाठी हा आऊटफिट परफेक्ट आहे.

इंडो वेस्टर्न

रक्षाबंधनात तुम्ही इंडो वेस्टर्न आऊटफिट स्टाईल करू शकता. यामध्ये काहीतरी वेगळा लुक दिसेल. इंडो वेस्टर्नमध्ये वेगवेगळे पॅटर्नही ट्राय करू शकाल.

कुर्ती प्लाझो-आपल्याला साधा सूट घालायचा असेल, तर पॅन्टसोबत कॉलर नेकलाइनसह डिझाइनची कुर्ती तुम्ही परिधान करू शकता. या कुर्तीवर तुम्ही मोठे कानातले परिधान केले, तर तुमचा लुक खूप उठून दिसेल.

सिबलिंग ट्विनिंग

हॅशटॅग राखी ट्विनिंग हे सध्या खूप ट्रेंडिंगमध्ये आहे. एखादे चांगल्या रंगाचं कापड घेऊन तुम्ही शिवू शकता. सेम टू सेम राखी आऊटफिट होईल आणि बहीण-भावाचे फोटोशूटसुद्धा छान होईल.

कॉंट्रास्ट ट्विनिंग

ट्विनिंग करणे म्हणजे एकाच रंगाचे कपडे घालणे हे गरजेचे नाही. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही कॉन्ट्रास्ट कपडे परिधान करू शकतात. कॉंट्रास्ट फॅशन सध्या ट्रेंडमध्ये असून तुम्ही अशाप्रकारे देखील ट्विनिंग करू शकतात. जसे की भावाने काळ्या रंगाची कुर्ती परिधान केली असेल, तर बहिणीने सफेद रंगाचा सलवार कुर्ता किंवा साडी परिधान करावी. बहीण-भावांचा लूक सुंदर दिसेल.

फ्लोरल धोती सेट

तुम्ही अशा प्रकारचा किंवा यामध्ये अनेक पॅटर्न मिळतात त्यामध्ये ड्रेस घेऊ शकता. खूप छान लूक होईल, सध्या हे मार्केटमध्ये खूप ट्रेंडी आहे. मोठी कुर्ती आणि धोती पॅन्ट अतिशय सुंदर लूक दिसेल.

अनारकली

रफल्स, फ्रिल्स आणि भरपूर प्लेट्स असलेला अनारकली सेट सध्या अधिक ट्रेंडमध्ये आहे. यावर त्याच रंगाची प्लाझो अधिक शोभून दिसते.

# बहिरंगापेक्षा अंतरंग सुधारा



लहानशा गोष्टी, मोठा अर्थ : शिल्पा अष्टमकर

रूप लावण्य अभ्यासिता नये ।
सहजगुणासी न चले उपाये ।
काहीतरी धरावी सोये ।
अगांतुक गुणाची ।

या ओवीत समर्थांनी सहजगुण आणि अगांतुक गुण असे दोन शब्द वापरले आहेत. जन्मत:च माणसाला जे प्राप्त होते त्याला समर्थ सहजगुण म्हणतात. उदा. गोरा असणे किंवा काळा असणे, उंच असणे किंवा बुटका असणे, दिसायला सुंदर असणे किंवा दिसायला सामान्य असणे हे सहज गुण आहेत. यात बदल घडवून आणणे माणसाला फारसे शक्य नाही. एखादा काळ्या रंगाचा मनुष्य रोज ब्युटी पार्लरमध्ये गेला तरी काही होणार नाही. म्हणून माणसाने व्यवहारात चार लोकांत वावरताना बहिरंग नीटनेटके ठेवावे पण ते फार सजवण्याच्या भानगडीत पडू नये.

समर्थ अगांतुक गुणाला महत्त्व देतात. अगांतुक गुण याचा अर्थ प्रयत्नांच्या सहाय्याने माणसाने संपादन केलेले उत्तम गुण किंवा उत्तम कला होय.

अब्राहम लिंकन दिसायला कुरूप होते, पण आपल्या सद्गुणांच्या सहाय्याने ते एक दिवस अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. यशवंतराव चव्हाण अत्यंत गरीब कुटुंबात जन्मले होते; परंतु प्रयत्नांच्या सहाय्याने ते एक दिवस भारताचे उपपंतप्रधान झाले. सहज गुणाच्या अभावाने माणसात निर्माण झालेले व्यंग अगांतुक गुणाच्या प्रभावाने दूर करता येते. माणसाने तासनतास आरशासमोर बसून आपला चेहरा सुधारण्यापेक्षा तासनतास ग्रंथालयात बसून आपले अंतरंग सुधारावे.

शिक्षणानंतर नोकरी मिळताना आपले बहिरंग कामी येणार नाही कारण त्यासाठी गुणवत्ता (टींरश्रळषळ-लरींळेप) सर्वात महत्त्वाची मानली जाते. मनुष्याची पारख / परीक्षा त्याच्यावरून दिसण्यात, सहवासात किंवा वागण्यात होत नसते. जसे सोने दिसण्यात, हातात घेतल्यास जवळ ठेवल्यास त्याची पारख होत नसून, काशावर घासताना सोन्याचा गुणधर्म कळतो.

बहिरंगापेक्षा अंतरंग सुधारा. सहज गुण व अगांतुक गुण यातील फरक लक्षात घ्यायला हवा. 'खोटे वरचे लक्षण, हवी अंतरीची खूण' समोरच्या व्यक्तीची पारख त्याच्या वरच्या गुणांवरून करू नये.आजच्या झगमगत्या जगात आपण बाह्य सौंदर्याकडे, म्हणजेच बहिरंगाकडे, अधिक झुकतो आहोत. व्यक्तीचा चेहरा कसा दिसतो, कपडे कोणते आहेत, सोशल मीडियावर कशी इमेज आहे. या गोष्टींनाच जास्त महत्त्व दिलं जातं. पण खऱ्या अर्थाने माणसाचे मूल्य त्याच्या अंतरंगातून ठरते. म्हणजेच त्याच्या विचारांतून, आचारांतून आणि चारित्र्यातून.

बहिरंग म्हणजे माणसाचा बाह्य आविष्कार-रूप, वेशभूषा, संपत्ती, पद, प्रसिद्धी वगैरे, तर अंतरंग म्हणजे त्याचे मन, संवेदना, मूल्य आणि आत्मिक समृद्धी. एक देखणा माणूस जर दांभिक, खोटारडा आणि स्वार्थी असेल, तर त्याचं सौंदर्य फक्त डोळ्यांना भुरळ घालेल; पण मनाला नाही. दुसरीकडे, एक साधा-सरळ माणूस जर नम्र, प्रामाणिक आणि सहृदय असेल, तर तो कायम मनात घर करतो.

आज अनेक लोक फिटनेससाठी, फॅशनसाठी आणि छायाचित्रांसाठी तासन्तास वेळ घालवतात, पण आत्मपरीक्षण, सद्विचार आणि आत्मिक विकासासाठी वेळ देत नाहीत. हीच खरी शोकांतिका आहे.

अंतरंग सुधारल्यावर माणूस दुसऱ्यांशी नीट वागतो, सहकार्य करतो, सहानुभूती दाखवतो. समाजात समृद्धी, शांती आणि सुसंवाद निर्माण होतो. बाह्य सौंदर्य नाहीसे होऊ शकते, पण अंतःकरणातील सौंदर्य हे चिरंतन टिकते.

संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, स्वामी विवेकानंद यांचं व्यक्तिमत्त्व आपण पाहिलं, तर ते त्यांच्या वेशभूषेने नव्हे, तर त्यांच्या अंतरीच्या तेजाने, विचारांनी आणि कार्याने प्रभाव टाकतात. म्हणूनच, आपला खरा विकास करायचा असेल, तर फक्त आरशात दिसणाऱ्या चेहऱ्यावर लक्ष केंद्रित करू नका, तर अंतर्मनात डोकावून बघा. कारण बहिरंग क्षणिक असते, पण अंतरंग शाश्वत.

शरीर सुंदर असणं ही एक गोष्ट आहे, पण मन सुंदर असणं ही जीवनाची गरज आहे.

# आता भारतावर सूड शुल्क चक्क ५०%



**अमेरिकेस भारतातून २०२४-२५ मध्ये एकूण ८२०.९३ अब्ज डॉलर्सची निर्यात झाली. त्यात वस्तू व सेवांचा समावेश आहे. शुल्कवाढीमुळे अनेक भारतीय उद्योगांवर प्रतिकूल परिणाम होईल.**

**भारतावर लादलेल्या २५ टक्के ङ्गप्रत्युत्तर शुल्काफ्ची अंमलबजावणी सुरू होण्याच्या आधी जेमतेम १४ तास अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर आणखी २५ टक्के कर लादण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली. यामुळे भारतातून अमेरिकेस होणार्या निर्यातीवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले आहे. जो माल सध्या जहाजे किंवा विमानांद्वारे अमेरिकेच्या वाटेवर आहे, त्यावर हे वाढीव शुल्क आकारले जाणार नाही. नव्या वाढीव शुल्काची अंमलबजावणी येत्या दि.२७ पासून सुरू होणार आहे. युक्रेनमधील रशियाच्या कृत्यांमुळे अमेरिकेत राष्ट्रीय आणीबाणीची स्थिती निर्माण झाली आहे, त्याचा सामना करण्यासाठी वाढीव शुल्क किंवा कर आकारला जात असल्याचे अध्यक्षीय आदेशात म्हटले आहे.**

रशियाकडून भारत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या खनिज तेलाची आयात करत असल्याने हे शुल्क आकारणे आवश्यक व योग्य ठरते. त्यामुळे आणीबाणीच्या स्थितीचा प्रभावीपणे सामना करता येईल असे अध्यक्षांचे मत आहे असेही या आदेशात म्हटले आहे. भारत व ब्राझीलवर ट्रम्प यांनी सर्वांत जास्त शुल्क लादले आहे. 'शत्रू' मानलेल्या चीनवर ३० टक्के शुल्क लादण्यात आले आहे. यामुळे बांगला देश, व्हिएटनाम व चीनच्या तुलनेत भारतीय निर्यात महागणार आहे. त्याचा निर्यात व अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होईल.

अयोग्य, अन्याय्य

भारत व अमेरिकेत व्यापार कराराच्या संदर्भात चर्चा सुरू आहे. ती पूर्ण होण्याआधीच प्रत्युत्तर शुल्क लादणे हेच चुकीचे आहे. आता रशियातून खनिज तेलाची आयात केल्याच्या कारणावरून २५ टक्के जादा कर लादणे अतार्किक आहे. आर्थिक प्रगती व देशाच्या जनतेची ऊर्जेची गरज भागवणे हा खनिज तेलाच्या आयातीमागील मुख्य हेतू असल्याचे भारताने पूर्वीच स्पष्ट केले आहे. सध्या भारत अमेरिकेतूनही खनिज तेलाची आयात करत आहे. गेल्या वर्षी जानेवारी ते २५ जून या काळात भारताने अमेरिकेतून जेवढे तेल आयात केले त्याच्या ५१ टक्के जास्त खनिज तेल यावर्षी याच काळात आयात केले, ही बाब ट्रम्प यांना माहीत नसेल असे मानता येत नाही. आंतरराष्ट्रीय दरापेक्षा रशियातून भारतास स्वस्त दरात तेल मिळते. साहजिकच रशियास भारत प्राधान्य देत आहे. युक्रेनवर रशियाने आक्रमण केल्यानंतर पाश्चात्त्य देशांनी रशियावर अनेक निर्बंध लादले असले तरी अजूनही युरोपीय देश रशियाकडून तेल व नैसर्गिक वायू खरेदी करत आहेत हे भारताने अमेरिकेच्या निदर्शनास या आधीही आणून दिले आहे. खुद्द अमेरिकेने रशियाकडून या वर्षी जानेवारी ते मे याकाळात २.१ अब्ज डॉलर्सची युरेनियम, पॅलेडिअयम धातू व खतांची खरेदी केली. भारतापेक्षा चीन रशियाकडून जास्त खनिज तेल खरेदी करतो, एवढेच नव्हे, तर रशियाला शस्त्रांचीही मदत करतो हे जगजाहीर आहे. तरीही चीनवर केवळ ३० टक्के शुल्क आकारले जाणार आहे. चीनच्या आर्थिक ताकदीपुढे ट्रम्प यांनी शरणागती पत्करल्याचे हे द्योतक आहे. ही शुल्कवाढ अयोग्य व अन्याय्य असल्याचे मत भारताने व्यक्त केले आहे, ते योग्य व साधार आहे. आयात-निर्यातीतील तफावत भरून काढण्यासाठी अमेरिकेतून ऊर्जा व संरक्षण क्षेत्रातून २५ अब्ज डॉलर्सची जादा खरेदी करण्याची तयारी भारताने चर्चेदरम्यान दाखवली आहे; मात्र अमेरिकन डेअरी व कृषी उत्पादने यांना भारताने बाजारपेठ अधिक खुली करावी, असा अमेरिकेचा आग्रह आहे. देशातील शेतकरी, दुग्ध व्यावसायिक व ग्राहक यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी भारताने ती मान्य केली नाही. याचा ट्रम्प यांना राग आहे. वाढीव शुल्काचा फटका भारतीय वस्त्रोद्योग, मत्स्य व्यवसाय, रत्ने व दागिने या क्षेत्रांना जास्त बसणार आहे. त्यांच्या निर्यातीवरील कर ५० ते ६३.९ टक्के होणार आहे. एकूण निर्यातीच्या ५५ टक्के मालावर या वाढीचा परिणाम होणार असल्याने निर्यातदार हबकले आहेत. भारताचा विकास दर घटण्याचीही भीती आहे. तरीही ट्रम्प यांच्या मनमानीपुढे भारत झुकण्याची शक्यता कमी आहे. हुकूमशाही वृत्तीच्या ट्रम्प यांनी त्यामुळेच भारतावर हे 'सूड शुल्क' लादले आहे.

## पौष्टिक खा, फिट राहा! — डॉक्टर टीप्स



नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...

**स्पिनिंग**

फायदे-० शरीरातील अतिरिक्त चरबीचं प्रमाण घटतं.
० तग धरण्याची क्षमता वाढते.

**एरोबिक्स**-नृत्यातून व्यायाम व्हावा यासाठी एरोबिक्सची निर्मिती करण्यात आली. एरोबिक्समध्ये केल्या जाणाऱ्या विविध शारीरिक हालचालींमुळे व्यायाम करणाऱ्यांमध्ये उत्साह निर्माण होतो आणि नृत्यामधून होणाऱ्या व्यायामामुळे मानसिक आनंदही प्राप्त होतो.(**क्रमशः**)





## विनोद

राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?
राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?
Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha....

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा:
साात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

## उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत
२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत
४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

## आडवे उत्तर

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अव-हेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

## उभे उत्तर

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनर-ाज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अम ावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ

# चॅप्लिन, चार्ल्स स्पेन्सर



पाश्चिमात्य चित्रपटसृष्टीतील जागतिक ख्यातीचा विनोदी नट आणि चित्रपट-निर्माता. लंडन येथे जन्म. आईवडीलही नाट्यव्यवसायात होते. ते व्होडव्हील या लोकनाट्याचे प्रयोग सादर करीत असत. चार्ल्सच्या लहानपणीच त्यांनी त्याला गाणे-नाचणे शिकविले होते. त्याच्या दुर्दैवाने लवकरच झालेला पित्याचा मृत्यू आणि आईची मनोविकृती यांमुळे चार्ल्सवर सातव्या वर्षीच पोटासाठी या कलेचा उपयोग करण्याची पाळी आली. सडकेवर जीवन जगणाऱ्या पोरक्या चार्ल्सचे बालपण अतिशय दारिद्र्यात व विपन्नावस्थेत गेले. त्यामुळे त्याचे शिक्षणही फारसे होऊ शकले नाही. त्यांच्या वयाच्या सतराव्या वर्षी त्याचा भाऊ सिडनी याने चार्ल्सला फ्रेंड कार्नो या नाटककंपनीत प्रवेश मिळवून दिला. १९१० मध्ये तो प्रमुख नट म्हणून काम करण्यासाठी या कंपनीसह अमेरिकेच्या दौऱ्यावर गेला. तेथे डिसेंबर १९१३ मध्ये त्याला किस्टोनच्या मॅक सेनेट या चलच्चित्रपटात काम करण्याची संधी प्राप्त झाली. त्यानंतर तो नाट्यमंचाकडे पुन्हा वळला नाही. किड ऑटो रेसेस ट व्हेनिस (१९१४) या त्याच्या दुसऱ्या चित्रपटात त्याने परिधान केलेला पोषाख मोठा वैशिष्ट्यपूर्ण होता. डोक्यावर डर्बी, हॅट, घट्ट झगासदृश कोट, ढिली-गबाळी बिजार, बेढब आकाराचे जोडे, फडफडणाऱ्या मिशा व हातात छडी या विचित्र वेशामुळे चार्ल्स प्रेक्षकांना मूर्तिमंत विनोद वाटे. परंतु, विनोदाबरोबरच प्रेक्षकांच्या मनात चार्ल्सविषयी अनुकंपाही निर्माण होई. एकमेवाद्वितीय ठरलेल्या या आपल्या उपहासात्मक भूमिकेतून चार्ल्स सामाजिक दंभाचारावर टीका करी. विनोद हा चॅप्लिनच्या कलेचा आत्मा असला, तरी विषाद हे तिचे जीवन होते, म्हणून चार्ल्सच्या या विनोदनिर्मितीचा शेवट शोकांतिकेत होई.
खास विदूषकी पेहेरावात चॅप्लिन
चार्ल्स 'फर्स्ट नॅशनल' कंपनीत १९१७ मध्ये शिरला. त्यानंतर दोन वर्षांनी डग्लस फेअरबँक्स, डेव्हिड ग्रिफिथ व मेरी पिकफर्ड यांच्या बरोबर त्याने 'युनायटेड आर्टिस्ट कार्पोरेशन' ही चित्रपट कंपनी स्थापन केली. हॉलीवुडमध्ये त्याचे स्वतःचे चित्रपट निर्मितीगृहही होते. बोलपटाविषयी त्याने फारशी आस्था दाखविली नाही. ध्वनीचा चित्रपटात फारसा उपयोग करू नये, असे त्यास वाटे. १९३६ मधील मॉडर्न टाइम्स या चित्रपटात त्याने आवश्यकतेपुरताच ध्वनीचा उपयोग केला होता. द ग्रेट डिक्टेटर (१९४०) व माँशुअर व व्हर्दो (१९४७) या चित्रपटांनी त्याला अफाट प्रसिद्धी मिळवून दिली, तर १९५२ मधील लाइम लाइट व १९५७ मधील ए किंग इन न्यूयॉर्क हे त्याचे चित्रपटही बरेच गाजले होते. त्यांपैकी लाइम लाइटला १९७३ मध्ये ऑस्कर पुरस्कार मिळाला. ए किंग इन न्यूयॉर्क या चित्रपटामुळे त्याच्यावर तो कम्युनिस्टांचा पक्षपाती असल्याचा आरोप करण्यात आला होता; परंतु त्याने तो नाकारला व 'मी विश्वाचा नागरिक आहे', असे कणखरपणे सांगितले. या धोरणाला अनुसरूनच त्याने १९६६ मध्ये ए कौंटेस फ्रॉम हाँगकाँग हा वैश्विक स्वरूपाचा चित्रपट निर्माण केला.
चार्ल्सचे वैयक्तिक जीवन वादळी प्रसंगांनी भरलेले असून अतिशयच अस्थिर स्वरूपाचे होते. त्याने आयुष्यात चारदा विवाह केला. डाव्या मतप्रणालीचा प्रसार करणारा अशी टीका त्याच्यावर झाल्यामुळे त्याने अमेरिकन नागरिकत्व झुगारले व १९५३ पासून तो आपली चौथी पत्नी आणि सहा मुले घेऊन स्वित्झर्लंडमध्ये जिनीव्हा येथे राहू लागला. १९६४ मध्ये त्याने आपले आत्मचरित्र प्रसिद्ध केले. १९७५ च्या मार्चमध्ये चार्ल्सने आयुष्याची ८६ वर्षे पूर्ण केली. याप्रसंगी त्याला एलिझाबेथ राणीने 'नाइटहूड' देऊन त्याचा सन्मान केला. लंडन ही त्याची मातृभूमी असली, तरी गेली साठ वर्षे तो लंडनच्या बाहेरच आहे; कम्युनिस्ट म्हणून अमेरिकेतूनही त्याला जावे लागले. १९७२ मध्ये त्याला ऑस्कर पुरस्कार देऊन अमेरिकेने त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न केला होता. ब्रिटननेही यापूर्वी एकदा त्याला नाइटहूड देऊ केली होती; पण त्याने नकार दिला होता. आता जीवनाच्या संध्याकालात मात्र या सन्मानाचा स्वीकार त्याने केला आहे. द प्रिक हा चित्रपट निर्माण करण्याचा इरादाही त्याने यावेळी व्यक्त केला. चार्ल्स चॅप्लिन या नावाने जगभर प्रसिद्ध असलेला हा थोर कलावंत यापुढे सर चार्ल्स चॅप्लिन म्हणून ओळखला जाईल.

# मी आणि देव आनंद चार आठवडे एकत्र राहिलो, पाकिस्तानी अभिनेत्री अनिता अयुब यांचा दावा





अनिता अयुब यांनी ९० च्या दशकात बॉलीवूडमध्ये प्रवेश केला. (फोटो : लोकसत्ता)
पाकिस्तानी अभिनेत्री व मॉडेल अनिता अयूब यांनी ९० च्या दशकात बॉलीवूडमध्ये प्रवेश केला. त्यांना त्यांच्या पहिल्याच चित्रपटात बॉलीवूडचे अभिनेते देव आनंद यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली.
अनिता अयूब यांनी देव आनंद यांच्या 'प्यार का तराना' (१९९३) या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. त्यानंतर ही अभिनेत्री देव आनंद यांच्याबरोबरच्या त्यांच्या प्रेमसंबंधांमुळे चर्चेत होती.
त्यानंतर १९९५ मध्ये अनिता पुन्हा देव आनंद यांच्याबरोबर 'गँगस्टर' चित्रपटात दिसल्या. त्यांनी वारंवार एकत्रित केलेल्या कामामुळे त्या काळात खूप चर्चा झाली की, ते दोघे प्रेमसंबंधात तर नाहीत ना?
आता,अनिता यांचा एक जुना व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे ज्यामध्ये त्यांनी देव आनंद यांच्याबरोबरच्या त्यांच्या नात्याबद्दल काही खुलासे केले होते. 'लहरें'शी झालेल्या त्या संभाषणात त्यांनी देव आनंद यांच्याबरोबरच्या त्यांच्या नात्याबद्दल सांगितले होते. त्या म्हणाल्या होत्या, माझे त्याच्याशी एक मोठा भाऊ, एक वडील, एक प्रियकर, एक आई अशा सर्व प्रकारचे नाते होते आणि त्यामुळे आमचे नाते खूप चांगले होते.
आम्ही चार आठवडे एकत्र राहिलो: अनिता अयुब
अभिनेत्रीने देव आनंद यांच्याबरोबर डेन्मार्कमध्ये एकत्र राहत असल्याचा दावा केला होता.
आम्ही चार आठवडे एकत्र राहिलो, ते तिसऱ्या मजल्यावर होते आणि मी दुसऱ्या मजल्यावर. जेव्हा तुम्ही अशा प्रकारे एकत्र राहता, दररोज सकाळी एकमेकांना भेटता आणि संपूर्ण दिवस एकत्र घालवता, तेव्हा तुम्हाला आपोआपच एखाद्या व्यक्तीबद्दल सर्व काही कळते. मला त्यांना माझा प्रियकर, माझी आई, माझे वडील, माझा भाऊ सर्व काही म्हणून निवडण्यात काहीच अडचण आली नाही.
देव आनंद यांचा अतुलनीय वारसा भारतीय चित्रपटसृष्टीला मिळालेली एक अमूल्य भेट आहे. सहा दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत त्यांनी ११० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. ते एक उत्तम दिग्दर्शक असण्याबरोबरच नवीन कलाकारांना शिकवण्यासाठी आणि उद्योगातील अनेकांना नवीन दिशा देण्यासाठी ओळखले जात होते. अभिनेता व मार्गदर्शक म्हणून भारतीय चित्रपटसृष्टीत त्यांचे खूप मोठे योगदान आहे.
अनिता यांच्याबाबदल बोलायचे झाले तर, त्या दिसायला खूप सुंदर होत्या आणि अभिनयही चांगला करीत होत्या. त्यामुळे त्यांना अनेक चित्रपटांची ऑफर मिळाली. पण, त्यांच्या करिअरपेक्षा त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे त्या अधिक चर्चेत राहिल्या. अनिता अयूब यांनी भारतीय उद्योजक सौमिल पटेल यांच्याशी लग्न केले आणि काही काळ त्या न्यूयॉर्कमध्ये राहिल्या. त्यानंतर त्यांचा घटस्फोट झाला. अनिता यांनी दुसरे लग्न पाकिस्तानी व्यापारी सुबक मजिद याच्याशी केले. सध्या त्या सर्वच ग्लॅमरपासून दूर साधे जीवन जगत असून, एकांतवासात असल्याची चर्चा आहे.


# बायकोचा आत्मा नवऱ्याच्या शरीरात? बेटर-हाफची लव्हस्टोरीची भन्नाट कल्पना आता सिनेमागृहात!




मुंबई : प्रेम, भूत आणि हास्याचा भन्नाट मेळ घालणारा आगामी मराठी चित्रपट 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. या घोस्ट कॉमेडीचा दमदार ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांच्या उत्सुकतेला अधिकच उधाण आले आहे. सुबोध भावे आणि रिंकू राजगुरू ही हटके जोडी या चित्रपटाच्या निमित्ताने मोठ्या पडद्यावर धमाल उडवायला सज्ज झाली आहे. या आधी 'पालतू फालतू' या मजेशीर गाण्यामुळे आणि 'ना कळले कधी तुला' या भावनिक गीतामुळे चित्रपटाविषयी कुतूहल निर्माण झालं होतंच, परंतु आता आलेल्या ट्रेलरमुळे प्रेक्षकांना या प्रेमकथेच्या गोंधळातल्या धमाल प्रवासाची झलक पाहायला मिळाली आहे.
सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत, रजत मीडिया एंटरटेनमेंट निर्मित या सिनेमाच्या ट्रेलरमध्ये एक वेगळी आणि हटके प्रेमकथा उलगडताना दिसते. सुबोध भावे याची 'बेटर-हाफ' म्हणजे पत्नी गेल्यानंतर तिचा आत्मा त्याच्याच शरीरात वास करत असल्याचं गोंधळलेलं चित्र ट्रेलरमध्ये पाहायला मिळतं. त्यातून सुटका मिळवण्यासाठी सुरू होतो विनोदी संघर्ष, ज्यात प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव यांची त्याला साथ मिळते. आता यातून सुबोध भावाची सुटका होते का, याचे उत्तर मात्र प्रेक्षकांना चित्रपट पाहूनच मिळणार आहे.
दिग्दर्शक संजय अमर या चित्रपटाविषयी सांगतात, ही घोस्ट कॉमेडी असली तरी ती एका आगळ्यावेगळ्या प्रेमकथेची सांगड घालते. कलाकारांच्या ताकदीमुळे ही संकल्पना पडद्यावर प्रभावीपणे साकारता आली. सुबोध आणि रिंकूची फ्रेश जोडी, प्रार्थना आणि अनिकेतसारखे अनुभवी कलाकार यांचं योगदान अमूल्य आहे.चित्रपटाचे निर्माता रजत अग्रवाल म्हणतात, आजच्या पिढीला नेहमी काहीतरी हटके आणि नाविन्यपूर्ण बघायचं असतं. 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' हे त्याचं उत्तम उदाहरण आहे. यामध्ये विनोद, सस्पेन्स, भावना आणि स्टारकास्ट यांचं परिपूर्ण मिश्रण आहे.
या चित्रपटाचे लेखन, छायांकन आणि दिग्दर्शन संजय अमर यांचेच असून, साजन पटेल आणि अमेय नरे यांनी संगीताची जबाबदारी सांभाळली आहे. सुबोध भावे, रिंकू राजगुरू, प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव यांच्यासारख्या दमदार कलाकारांच्या अभिनयाने साकारलेला हा सिनेमा येत्या २२ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# अभिनेत्री हुमा कुरेशीच्या चुलत भावाची हत्या

नवी दिल्ली: बॉलिवूड अभिनेत्री हुमा कुरेशीच्या चुलत भावाच्या हत्येचे प्रकरण समोर आले आहे. दिल्लीच्या निजामुद्दीनमध्ये पार्किंगवरून झालेल्या वादात हुमाचे भाऊ आसिफ कुरेशी यांची हत्या करण्यात आली. पोलिसांनी या हत्या प्रकरणातील आरोपींना अटक केली आहे.



निजामुद्दीनच्या जंगपुरा भोगल बाजार लेन परिसरात रात्री उशिरा स्कूटीला गेटवरून बाजूला लावण्यावरून वाद झाला होता. या वादात आरोपींनी आसिफ कुरेशीवर हल्ला केला. गंभीररित्या जखमी झालेल्या आसिफला रुग्णालयात नेण्यात आले. येथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.७३लु *यमृत व्यक्तीच्या पत्नीचे आणि नातेवाईकांचे म्हणणे आहे की छोट्याशा गोष्टीवरून झालेल्या वादात आरोपींनी निघृणपणे हत्या केली. मृत व्यक्तीच्या पत्नीच्या माहितीनुसार पार्किंगवरून याआधीही आसिफ यांचा त्या लोकांशी वाद झाला होता. माझे पती कामावरून परतल्यानंतर त्यांना घरासमोर शेजाऱ्यांनी लावलेली स्कूटी दिसली. ती बाजूला करण्यास सांगितले. मात्र शेजाऱ्यांनी शिवीगाळ देण्यास सुरूवात केली. तसेच धारदार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला केला.

# प्राजक्ता गायकवाडचा साखरपुडा संपन्न, शेअर केले खऱ्या आयुष्यातील शंभूराज यांच्यासोबतचे फोटो



मुंबई: स्वराज्यरक्षक संभाजी मालिकेतील येसूबाई म्हणजेच खऱ्या आयुष्यातील प्राजक्ताचा साखरपुडा नुकताच संपन्न झाला आहे. तिच्या खऱ्या आयुष्यातील शंभूराजे तिच्या जीवनात आले आहेत. प्राजक्ताने तिच्या जोडीदारासोबतचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. स्वराज्यरक्षक संभाजी मालिकेत येसूबाईंची कणखर भूमिका साकारल्याने प्राजक्ता महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचली होती. तिने मराठी चित्रपट तसेच मालिकांमधून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे
काही दिवसांपूर्वी प्राजक्ताने आपला साखरपुडा होत असल्याचे सोशल मीडियाद्वारे सांगितले होते. तिचे लवकरच लग्न होणार असल्याचे तिने फोटोतून दाखवले होते. मात्र तिचा होणारा जोडीदार कोण असेल याची माहिती तिने गुलदस्त्यात ठेवली होते. अखेर तिच्या जोडीदाराचे फोटो समोर आले आहेत.
प्राजक्ता आणि तिच्या खऱ्या आयुष्यातील शंभूराज यांचे फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. अनेक कलाकारांनी तिला तिच्या नव्या इनिंग्जसबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

# अभिनेत्री सई ताम्हणकरला पाँडिचेरी चित्रपटासाठी उत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार



मुंबई : मराठी अभिनेत्री सई ताम्हणकर हिला 'पाँडिचेरी' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून यंदाचा महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार प्राप्त झाला आहे. ती अनेकदा तिच्या अभिनयासाठी आणि तिच्या स्टाईलसाठी ओळखली जाते.
उत्तम अभिनय जिद्द, चिकाटीच्या जोरावर मराठी सिनेसृष्टीच नाही, तर बॉलिवूडमध्येही स्वत:चं वेगळं अस्तित्व निर्माण केलेली अभिनेत्री म्हणजे सई ताम्हणकर. हिंदी असो किंवा मराठी सईने तिच्या अभिनयाची जादू दोन्ही इंडस्ट्रीत दाखवून दिली आहे . तिच्या उत्कृष्ट अभिनयामुळे तिला पाँडिचेरी चित्रपटासाठी ६० आणि ६१ व्या महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्काराअंतर्गत तिला गौरविण्यात आले आहे .
ज्या चित्रपटासाठी सई उत्कृष्ट अभिनेत्री ठरली त्या 'पाँडिचेरी' चित्रपटाची खासियत म्हणजे सईची चित्रपटातील लक्षवेधी भूमिका. तिचा या चित्रपटातील अभिनय अनेक गोष्टी साठी चर्चेत राहिला तो म्हणजे तिचा साधा सरळ पण तितकाच लक्षवेधी लूक, अनेक भाषा मधला तिचा या चित्रपटातील संवाद आणि एका मुलाच्या आईची भूमिका. पाँडिचेरी मधल निकिता हे पात्र बहुगुणी ठरलं अस म्हणणं वावगं ठरणार नाही आणि म्हणून सई पुन्हा एकदा अव्वल ठरली आहे
या पुरस्काराचा आनंद व्यक्त करताना सई म्हणाली, 'पाँडिचेरी' या संपूर्ण चित्रपटाचा अनुभव खूप वेगळा आणि कमाल होता आम्हाला कोणत्याही कलाकाराला या चित्रपटासाठी स्टाफ नसताना हेअर करणं, स्वतःचा ठरलेला कॉस्च्युम घालून रेडी होऊन येणं अस सगळ काही स्वतःच स्वतः ला काम करताना एक स्वावलंबी झाले आणि म्हणून आज मी एवढी स्वावलंबी झाली की कुठल्याही चित्रपटाच्या सेटवर मी स्वतःच स्वतःहा सगळं करू शकते आणि हे फक्त पाँडिचेरी मुळे शक्य झालं.' असे सई म्हणाली आहे.पुढे ती म्हणाली, 'पाँडिचेरी' मधली निकिता ही भूमिका माझ्यासाठी जीवाच्या अत्यंत जवळची आहे कारण ही अशी भूमिका होती ज्यासाठी खूप अभ्यास करावा लागला होता. शहराचा एक फ्लेवर उतरतो चित्रपटात तसा पाँडिचेरीचा फ्लेवर अगदी सुंदररित्या यात उतरला आहे सचिन कुंडलकर हा असा एक दिग्दर्शक आहे ज्याचा एस्थेक्टिक सेन्स खूप कमाल आहे आणि तो पाँडिचेरी मध्ये असल्याने हा चित्रपट आणि त्यातली निकिता उत्तम दिसून आली आहे. मला महाराष्ट्र शासनाच्या वतीने हा एवढा मोठा पुरस्कार आणि तो देखील उत्तम अभिनेत्री साठी देण्यात आला या साठी मी कृतज्ञ आहे.'
'आपल महाराष्ट्र शासन आणि सांस्कृतिक विभाग यांचे खूप आभार.आपल्या कामाची दखल जेव्हा महाराष्ट्र शासन घेत आणि आपल्याला एवढा मोठा पुरस्कार देत तेव्हा नक्कीच अभिमान वाटतो आणि खूप आनंद देखील होतो. मला पहिला महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार २०११ साली दुनियादारी चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट सहायक्क अभिनेत्री म्हणून मिळाला होता आणि आता सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून मिळाला म्हणून तो तितकाच खास आहे. आपल्या महाराष्ट्र राज्याने दिलेली ही शाबासकी आहे असं मला वाटतं. मराठी सिनेमाची दखल घेऊन मला हा पुरस्कार दिल्याबद्दल सांस्कृतिक विभाग आणि माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खूप आभार'.

# अभिनेत्री प्रिया बापट करणार हॉरर जॉनरमध्ये पदार्पण

मुंबई : अभिनेत्री प्रिया बापट जिने मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीतही आपल्या अभिनयाची जादू दाखवली आहे . आपल्या अभिनयाच्या विविध छटांमध्ये रसिकांची मनं जिंकणारी प्रिया बापट आता एका नव्या आणि थरारक अविष्कारात दिसणार आहे. प्रिया बापट 'अंधेरा' या अमेझॉन प्राईमवरील हॉरर सिरीजमधून हॉरर जॉनरमध्ये पहिल्यांदाच पदार्पण करतेय. या सिरीजमध्ये ती पहिल्यांदाच पोलिसाची भूमिका साकारत आहे. नुकताच या सिरीजचा ट्रेलर सोशल मीडियावर झळकला असून, त्याने प्रेक्षकांमध्ये एकाच वेळी भीती आणि उत्सुकता निर्माण केली आहे. तिच्या चाहत्यांसाठी ही एक आनंदाची बाब आहे.
माध्यमांशी बोलताना तिने तिच्या या चित्रपटातील अनुभव सांगितला आहे . ती म्हणाली , ''मी पहिल्यांदाच हॉरर जॉनरमध्ये काम करतेय आणि हा अनुभव खरोखरच वेगळा ठरला. खूप नाईट शिफ्ट्समध्ये शूटिंग केलं, परंतु स्क्रिप्ट इतकी इंटरेस्टिंग होती की, काम करताना काहीच जाणवले नाही. जेव्हा हे स्क्रिप्ट मला मिळालं, तेव्हा वाचून एकच विचार मनात आला, तो म्हणजे सध्या वाचलेल्या स्क्रिप्ट्सपैकी हे सर्वात उत्तम होतं. ही कथा फार वेगवेगळ्या पद्धतीने उलगडते आणि म्हणूनच ती अभिनयाच्या दृष्टीने खूपच आव्हानात्मक ठरली. यात ॲक्शन सिक्वेन्सेस आहेत, भीतीदायक हॉरर सीन आहेत. त्यामुळे कलाकार म्हणून ही भूमिका करताना एक वेगळीच मजा आली. आतापर्यंत मी राजकारणी, वकील यांसारख्या विविध भूमिका साकारल्या आहेत. मात्र, या सिरीजमध्ये मी एका पूर्णतः वेगळ्या प्रोफेशनमधून प्रेक्षकांसमोर येणार आहे. मराठीत मला जसं प्रेम मिळालं, तसंच प्रेम मला हिंदी प्रोजेक्ट्ससाठीही मिळालं, याचा खूप आनंद आहे. आता हॉरर जॉनरमधून मी प्रेक्षकांचं मन कसं जिंकू शकेन, याचीच उत्सुकता लागली आहे. ट्रेलर प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांचा प्रतिसाद बघायला मी प्रचंड उत्सुक आहे. आशा आहे, प्रेक्षक या भूमिकेलाही तितकंच प्रेम देतील.''



'अंधेरा'चं ट्रेलर पाहून प्रेक्षकांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. कथानक काय आहे? हे रहस्य नेमकं कुठं घेऊन जाणार आहे? मात्र या सगळ्या प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना लवकरच प्रेक्षकांना मिळणार आहेत, परंतु तोपर्यंत 'अंधेरा'ची ही थरारक झलक आणि प्रिया बापटचं हॉरर शैलीतील पदार्पण यामुळे ही सिरीज चर्चेचा विषय ठरली आहे.

## कर्मयोगी डॉक्टर शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न



**निलंगा/आयुब बागवान:** डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा येथे निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भित्तिपत्रक स्पर्धा, रांगोळी स्पर्धे चे आयोजन करण्यात आली होते. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम म्हणाले, ''की सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा.''तसेच महाराष्ट्र महाविद्यालयाचे उपप्राचार्य यांनी कनिष्ठ महाविद्यालय मध्ये चालत असलेल्या विविध उपक्रमाची व कोर्सेसची माहिती दिली. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा.सूर्यकांत वाघमारे, डॉ. बालाजी हजारे, डॉ. अशोक तुगावे प्रा. श्रीराम पौळकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीकृष्ण दिवे यांनी केले. तर आभार प्रा. दत्ता गोसलवाड यांनी मानले यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## आर. व्ही. देशमुख यांना उत्कृष्ट मंडळ अधिकारी पुरस्कार, महसूल दिनी जिल्हाधिका-यांच्या हस्ते गौरव



**निलंगा/आयुब बागवान:** निलंगा तहसील कार्यालयात मंडळ अधिकारी पदावर कार्यरत असणारे निटूर ता. निलंगा येथिल राजकुमार विश्वंभरराव देशमुख यांना शासनाच्या महसूल दिनाचे अवचित्य साधून उत्कृष्ट मंडळ अधिकारी पुरंस्कार प्रदान करण्यात आला लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते हा पुरस्कार लातूर येथे दिमाखदार कार्यक्रमात प्रदान करण्यात आला देशमुख यांना हा पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. मुळचे निटूर ता. निलंगा येथिल राहणारे व सध्या तहसिल कार्यालय निलंगा येथे मंडळ अधिकारी पदावर कार्यरत असणारे राजकुमार विश्वभरराव देशमुख यांना यापूर्वी उत्कृष्ट तलाठी व काही दिवसापूर्वी मंडळ अधिकारी पदी असताना चांगल्या कार्याबद्दल पुरस्कार मिळाला होता त्यानंतर आता पुन्हा महसूल सप्ताह मध्ये जिल्हाधिकारी यांच्या हस्ते तीसरा पुरस्कार मिळाल्याने आर व्ही देशमुख निटूर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.





## महाराष्ट्र महाविद्यालयचे यश

**निलंगा/आयुब बागवान:** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत अजून अंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा जय क्रांती महाविद्यालय लातूर यांच्या कडे पार पडली या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा येथील राठोड पवन दत्ता काकडे शाहूराज लक्ष्मण पवार धम्मदीप टोम्पे श्रेयस जाधव कमलाकर काकणे कृष्णा हे विद्यार्थी प्राध्यापक डॉक्टर गोपाळ मोघे क्रीडा विभाग प्रमुख महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी झाले ही स्पर्धा १२ किलोमीटर अंतरची होती यामध्ये सर्वसाधारण द्वितीय क्रमांक काकडे शाहूराज या विद्यार्थ्यांनी प्राप्त केला तर तृतीय क्रमांक राठोड पवन या विद्यार्थ्याने प्राप्त केला सर्वसाधारण विजेतेपदांमध्ये महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा यांचा तृतीय क्रमांक आला विजय खेळाडूंचे महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष माननीय विजय पाटील निलंगेकर साहेब यांनी अभिनंदन केले आहे तसेच प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, डॉ. धनंजय जाधव डॉ. बालाजी गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ६.२ मिलीमीटर पावसाची नोंद

**लातूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यात ८ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ६.२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये चाकूर तालुक्यात सर्वाधिक १३.६ मिलीमीटर, तर शिरूर अनंता तालुक्यात सर्वात कमी २.४ मिलीमीटर पाऊस झाला आहे. तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- २.७, औसा- ३.१, अहमदपूर- ९.७, निलंगा- ६.५, उदगीर- ९.७, चाकूर- १३.६, रेणापूर- ३.२, देवणी- २.९, शिरूर अनंतपाळ- २.४ आणि जळकोट- ८.९ मिलीमीटर.



# प्राध्यापकांनी उच्च शिक्षणातील आव्हानांवर मात करून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविले पाहिजे : कुलगुरु प्रा. श्रीनिवास वरखेडी

**लातूर/प्रतिनिधी:** आज बदलत्या काळानुसार उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविताना अनेक आव्हाने आ वासून उभे आहेत. त्या आव्हानांना विद्यार्थी,पालक, प्राध्यापक आणि संस्थाचालक अशा सर्वांना सामोरे जावे लागते आहे.आजचे न परवडणारे खर्चिक शिक्षण,वाढते खाजगीकरण,वाढती बेरोजगारी,कालबाह्य अभ्यासक्रम अशी अनेक आव्हाने आहेत.त्या आव्हानांवर उपाययोजना करणे ही आधुनिक काळाची खरी गरज आहे. सुंदर पिचई या एका भारतीय-अमेरिकन उद्योगपती आणि गुगल व अल्फाबेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा आदर्श घेतला पाहिजे. त्यांनी गुरूच शिष्यांना नीतिमूल्ये देऊ शकतात याचे महत्त्व जाणले.आज विद्यार्थ्यांना गुगल व एआयवर सर्व माहिती उपलब्ध होत आहे,असे असले तरी गुरुचे महत्त्व मानवी जीवनात अनन्यसाधारण असे आहे.आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थी स्वतःच्या पायावर सक्षम राहतील या दृष्टिकोनातून कौशल्याधारित शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे.तसेच आंतरविद्याशाखीय शिक्षण व विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार शिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. प्राध्यापकांनी वर्गातील व वर्गाच्या बाहेरील सर्व आव्हानांवर मात करून विद्यार्थ्यांचे यशस्वी करिअर घडविले पाहिजे,असे प्रतिपादन न्यू दिल्ली येथील केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.श्रीनिवास वरखेडी यांनी केले.

येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०७ ऑगस्ट २०२५ रोजी नवीन युगातील उच्च शिक्षणाची आव्हाने : प्राध्यापकांसह संवाद सत्र या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे संस्थेचे सचिव रमेश बियाणी होते.याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य





डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर,प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,प्राचार्य डॉ.पुनम नाथांनी,प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस, प्राचार्य प्रिती पटवारी,उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी असे म्हणाले की,दयानंद शिक्षण संस्थेत तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक आहेत. संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात तसेच विद्यार्थ्यांमध्ये विषय ज्ञानाबरोबर सभ्यता व संस्कार अशा अनेक गुणांची रुजवणूक करून एक आदर्श नागरीक,चांगला समाज व देशहित साध्य केले पाहिजे आणि सर्वांनी आनंदी जीवन जगले पाहिजे असेही ते म्हणाले.

प्रास्ताविकातून प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी उच्च शिक्षणातील आव्हाने या विषयावर प्राध्यापकांसह संवाद चर्चासत्राचे आयोजन करण्यामागची भूमिका सविस्तरपणे सांगितली तर सूत्रसंचालन व आभार प्रा.मेघा पंडित यांनी मानले.मा. कुलगुरू यांनी प्राध्यापकांच्या सर्व प्रश्नांचे,शंका-कुशंकाचे निराकरणही केले.या कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रम समन्वयक डॉ.विश्वनाथ मोटे यांनी केले.याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेतंर्गत असलेल्या दयानंद कला,वाणिज्य,विज्ञान,विधी,फार्मसी व आर्किटेक्चर अशा सर्वंच महाविद्यालयातील प्राचार्य,उपप्राचार्य,कार्यालयीन अधीक्षक,सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## हर घर तिरंगा मोहीम; शहरात तीन टप्प्यात विविध उपक्रमांचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी:** नागरिकांत देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढविणे यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार लातूर शहरात हर घर तिरंगा मोहीम राबविण्यात येणार आहे.१५ ऑगस्ट पर्यंत एकूण तीन टप्प्यात ही मोहीम राबविली जात आहे.

भारताच्या राष्ट्रध्वजासोबत वैयक्तिक बंध निर्माण करण्यावर हा उपक्रम आधारित आहे. २०२२ पासून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून राबविली जाणारी ही मोहीम आता लोक चळवळ बनलेली आहे.या अंतर्गत लातूर शहरात तीन टप्प्यात विविध उपक्रम होत आहेत. पहिल्या टप्प्यात शुक्रवार दि.८ रोजी सिद्धार्थ सोसायटीतील बौद्ध विहार येथे रांगोळी स्पर्धा संपन्न झाली. एलआयसी कॉलनी येथे रांगोळी स्पर्धा व प्रतिज्ञा तर मनपा मुख्यालय तिरंगा थीमवर आधारित वस्तू प्रदर्शन व विक्री सुरू आहे. दुसऱ्या टप्प्यात सोमवार दि. ११ ऑगस्ट रोजी मनपाच्या सर्व १६ शाळांमध्ये शिक्षण विभागाच्या वतीने तिरंगा रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. याशिवाय प्रश्नमंजुषा स्पर्धाही होणार आहे.मंगळवार दि. १२ ऑगस्ट रोजी तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.वाहन विभागाच्या वतीने आयोजित या रॅलीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील आंबेडकरांच्या पुतळ्यापासून प्रारंभ होणार आहे. शिवाजी चौक, राजीव गांधी चौक, परत शिवाजी चौक, गांधी चौक, गंजगोलाई, तेथून परत महानगरपालिका कार्यालयात या रॅलीचे विसर्जन होणार आहे.

बुधवार दि.१३ ऑगस्ट रोजी तिसऱ्या टप्प्यात भांडारपाल व शिक्षण विभागाच्या वतीने तिरंगा ट्रिब्यूट आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये स्वातंत्र्यसैनिक व शहीद जवानांचे स्मरण तसेच सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

## मुक्तांगण इंग्लिश स्कुलमध्ये राखी पौर्णिमाउत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी:** विशाल नगर लातूर येथील मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये विद्यार्थ्यांनी राखी पौर्णिमा सण उत्साहात साजरा केला. या प्रसंगी प्राचार्या सुमेरा शेख यांची उपस्थिती होती. मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये राखी पौर्णिमा सण साजरा केला. हा सण बहिण आणि भाऊ याचे नाते सांगणारा सण म्हणून ओळखला जातो. भावाने बहिणेचे रक्षण करावे असा संदेश या दिवशी दिला जातो. भावाला बहिणीने राखी बांधल्यानंतर भाऊ बहिणीला भेटवस्तू देतो. शाळेतील मुलीनी आपल्या वर्गबंधुना राखी बांधून राखी पौर्णिमेचा सण शाळेमध्ये आनंदातसाजरा केला. शाळेच्या शिक्षिका मयुरी देशमुख यांनी राखी पौर्णिमा सणाविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना शाळेतर्फे राखी पौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका तमन्ना शेख यांनी केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सुरक्षा समितीची बैठक संपन्न

**धाराशिव/प्रतिनिधी:** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव येथे सुरक्षा समितीची मासिक आढावा बैठक व दि.१५ ऑगष्ट स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर बैठक घेण्यात आली, यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव, महिला रुग्णालय धाराशिव येथील सुरक्षितता विषयी चर्चा करण्यात आली. तसेच कार्यरत सुरक्षा एजन्सीचा आढावा घेण्यात आला,सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेले पॉईंट्स निश्चितीसाठी,सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेली सुरक्षा रक्षकांची संख्या निक्षित करणे,त्यांचे कार्य सक्षमरित्या व्हावे जेणेकरून रेसिडेंट डॉक्टर व रुग्ण यांच्या सुरक्षेची आवश्यक खबरदारी घेतली जाईल याचे नियोजन व नियमित देखरेख करण्यासाठी चर्चा करण्यात आली.सुरक्षा रक्षकांच्या प्रश्नांचे व त्यांच्याविरुद्ध येणाऱ्या विविध तक्रारीचे निवारण करणे,महिन्यातुन एक वेळा सुरक्षा रक्षकांचा परेड घेऊन त्यांना आवश्यक सूचना देणे.महिन्यातून एक किंवा दोन वेळा आकस्मितरित्या भेट देऊन सुरकारक्षक आपापल्या जागेवर आपली डयुटी करतात का अशा बाबीवर चर्चा करण्यात आली,तर तंबाखू गुटखा रुग्णालय आवारात खाणारे रुग्ण नातलग,कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कारवाई भरती प्रकाश टाकण्यात आला,यावेळी समितीचे अध्यक्ष,प्राध्यापक तथा विभाग प्रमुख,न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे डॉ.विश्वजीत पवार,अधिसेविका सुमित्रा गोरे,सहाय्यक अधिसेविका रिबेका भंडारे, सदस्य अब्दुल लतीफ, सदस्य गणेश वाघमारे, सदस्य श्री जावळे, कॉन्स्टेबल सदस्य, सिक्युरिटी गार्डचे सुपरवायझर आणि इतर सदस्य उपस्थित होते.

## आमदार रमेशआप्पा कराड यांच्याकडून रेणापूर येथे साबणे कुटुंबीयांचे सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी:** रेणापूर येथील सेवानिवृत्त वयोवृद्ध शिक्षक सुधाकर वैजनाथ साबणे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. सदर घटनेची माहिती मिळाल्याने लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी रेणापूर येथे त्यांच्या निवासस्थानी जाऊन साबणे कुटुंबीयांचे सांत्वन केले.

आ. रमेशआप्पा कराड यांनी साबणे गुरुजी यांचे चिरंजीव गणेश साबणे आणि महेश साबणे यांच्याशी चर्चा करून सांत्वन केले. यावेळी आ. कराड यांच्या समवेत भाजपाचे प्रदीप पाटील खंडापूरकर, विक्रमकाका



शिंदे, भागवत सोट, अभिषेक आकनगिरे, गोविंद नरहरे, सतीश आंबेकर, महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, अच्युत कातळे, विजय चव्हाण, महेश गाडे, दत्ता सरवदे, चंद्रकांत कातळे, दिनकर राठोड, उज्वल कांबळे, उत्तम चव्हाण, रमेश चव्हाण, गणेश चव्हाण, सचिन शिरसकर, संतोष राठोड, अंतरात चव्हाण, ज्योतीराम इरकटे, नितीन क्षिरसागर यांच्यासह अनेक जण होते.

# अहमदपूरात सोमवारी आक्रोश आंदोलन मोर्चाचे आयोजन

**अहमदपूर/प्रतिनिधी:** अहमदपूर तालूक्यातील विविध प्रलंबीत प्रश्नांच्या संबंधाने वारंवार पाठपूरावा करून सूध्दा तालूका प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असून या सर्व विकास प्रश्न समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सम्राट मित्र मंडळाच्य वतीने सोमवारी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश अंदोलन गाढव मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंश यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

प्रसिद्धी पत्रकात पूढे म्हटले आहे की अहमदपूर तालूक्यातील अनेक गावामध्ये स्वतःच्या उपजिविकेसाठी गायरान ताब्यात घेवून शेती करतात त्यांच्या नांवे जमीनीचे पट्टे करावेत,उपजिल्हा रूग्णालयास मंजूरी द्यावी,अनेक गावात सार्वजनिक स्मशानभूमी नाहीत तसेच दलित समाजासाठी स्मशानभूमी नाहीत त्या तातडीने मंजूर कराव्यात,निराधार अपंग परितक्त्या यांना शासनाचे नियमीत अनुदान चालू करावे,जुजबी कारणाने बंद केलेले अनूदान चालू करावेत,२१ हजाराचे उत्पन्न प्रमाणपत्र देवून गरजूंना या योजनेचा लाभ देण्यात यावा,अहमदपूर शहरातील घनकचरा व्यवस्थापनावर काम करणाऱ्या मजुरांचे गेल्या १७ महिन्यांपासून थकीत असलेली पगार देण्यात यावे,अहमदपूर स.नं.४ वरील अतिक्रमण धारकांना कबालनामे दिले मात्र याची नोंद न.प. मालमत्ता रजिस्टरवर घेतली नाही परिणामी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत त्यांचे फॉर्म भरले गेले नाहीत या सर्वांचे फॉर्म भरून घ्यावेत.

शहरात शासनाचा निधी समान प्रमाणात वाटप करण्यात यावा,शहर स्वच्छतेचे काम नियमीत पणे करण्यात यावे,एमआयडीसी परिसरात रहाणाऱ्या भटक्या विमुक्त लोकांना घरकूल मंजूर करावेत, ग्रामीण रूग्णालयातील ट्रामा केअर सेंटर पूर्ण क्षमतेने चालू करावे,ब्लड स्टोरेज केंद्र चालू करावे, उस्मान बी अफ्फान शाळेला संरक्षण भिंत बांधावी ,इ दगाह मैदान या ठिकाणी चार हायमास्ट मिनीमाष्ट लाईट मंजूर करावेत, रमाई घरकूलाच्या अनुदानात वाढ करावी,अहमदपूर बसस्थानकासमोरील नवीन शौचालय तातडीने सूरूवात करावे, मालमत्ता रजिस्टरवर नोंद करण्यासाठी नागरिकांकडून अन्यायकारक ३% रक्कम वसूल करण्यात येवू नये,अहमदपूर शहरातील सर्व जातीतील गोर गरीब बेघरांचा सर्व्हे करून पाच हजार घरे मंजूर करावेत आणी बेघरांना ते वाटप करावेत,सामाजिक न्याय विभागाचा निधी इतरत्र न वळवता तो पूर्ववत विभागास परत द्यावा,मौजे परचंडा,गंगाहिप्परगा,उजना,सिंदगी खुर्द, सूमठाणा,गूगदळ,हगदळ,लांजी,पाटोदा, तीर्थ,किनी कद्दू,मूळकी,वंजारवाडी,सांगवी सु.उमरगा इत्यादी गायरान अतिक्रमण धारकांचे पीक पंचनामे करून एक ई रजिस्टला नोंद घेण्यात यावी,धानोरा खू. येथील बौध्द मातंग समाजासाठी स्मशानभूमी शेड मंजूर करावे,सिद्धार्थ नगर येथील आनंद बुध्द विहार भूसंपादनासाठी निधी मंजूर करावा व सामाजिक सभागृहासाठी निधी मंजूर करावा,शिरूरताजबंद येथील अजहर शेख यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून नऊ जणांचे प्राण वाचविले याचा राज्य राष्ट्रीय स्तरावर सन्मान करावा. या सह अनेक ज्वलंत प्रलंबित विषयावर युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली आक्रोश अंदोलन गाढव मोर्चा चे आयोजन करण्यात आले आहे.या महत्वपूर्ण मोर्चासाठी नागरिकांमध्ये सूध्दा कमालीची उत्सुकता असून प्रशासनाकडून काय कार्यवाही होती हे पहाणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# पंतप्रधान तीन वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवणार

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेन्द्र मोदी १०.०८.२०२५ रोजी केएसआर बेंगळूरू रेल्वे स्थानकावरून अजनी (नागपूर)-पुणे वंदे भारत, केएसआर बेंगळूरू- बेळगावी वंदे भारत आणि श्री माता वैष्णोदेवी कटड़ा -अमृतसर वंदे भारत या ३ वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवतील. या गाड्या केंद्रीय रेल्वे, माहिती आणि प्रसारण आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सुरू होतील.

अजनी (नागपूर) ते पुणे दरम्यान धावणारी वंदे भारत ट्रेन ही महाराष्ट्रातील १२वी वंदे भारत गाडी ठरणार आहे आणि वर्धा ते मनमाड दरम्यानच्या अद्याप सेवा न मिळालेल्या भागाला पहिल्यांदाच वंदे भारत ट्रेनची सेवा मिळणार आहे.

नागपूर आणि पुणे ही दोन्ही वेगाने विकसित होत असलेली महानगरे असून येथे अनेक लघु व मध्यम उद्योग, शैक्षणिक व वैद्यकीय संस्था, तसेच ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे आहेत.

नागपूर, ज्याला संत्र्यांचे शहर / उत्तम आरोग्यनगरी म्हणून ओळखले जाते आणि काहीवेळा महाराष्ट्राची हिवाळी राजधानी असेही संबोधले जाते, हे शहर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी जवळून निगडीत आहे. याठिकाणीच दीक्षाभूमी आहे, जिथे बाबासाहेबांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता. ही बौद्ध श्रद्धाळूंसाठी एक प्रमुख तीर्थक्षेत्र असून दरवर्षी लाखो अनुयायी येथे भेट देतात. हे एक तीर्थक्षेत्रदेखील आहे, कारण रामटेक येथे प्रभु रामाचे प्राचीन मंदिर आहे. असे मानले जाते की वनवासाच्या काळात प्रभु राम काही काळ या ठिकाणी थांबले होते. याशिवाय येथे अन्य धार्मिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणेदेखील आहेत. शैक्षणिक केंद्र असण्याबरोबरच नागपूर हे वैद्यकीय सुविधांचे केंद्र (मेडिकल हब) देखील आहे. येथे अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था तसेच इतर प्रतिष्ठित वैद्यकीय संस्था असून त्या संपूर्ण विदर्भातील रुग्णांना सेवा देत आहेत.

नागपूरला भारतातील वाघांची राजधानी असेही म्हटले जाते, कारण या परिसरात अनेक वन्यजीव अभयारण्ये आहेत.

पुणे, ज्याला महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते, हे समृद्ध इतिहास लाभलेले शहर आहे. हे महान मराठा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी घट्टपणे जोडलेले आहे. पुण्यातील लाल महाल हे त्यांचे वास्तव्याचे ठिकाण होते, तर शिवनेरी किल्ला हे त्यांचे जन्मस्थान आहे. याशिवाय या परिसरात अनेक किल्ले आहेत, जे त्यांच्या कार्यकाळाशी निगडीत आहेत. पुण्यात तत्कालीन पेशव्यांचे वास्तव्य असलेला प्रसिद्ध शनिवारवाडा देखील आहे. पुणे विविध प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांसाठी ओळखले जाते. तसेच हे एक तीर्थक्षेत्रदेखील आहे, कारण शहरात प्रसिद्ध दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर आहे आणि परिसरात आळंदी, जेजुरी यांसारखी धार्मिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणेही आहेत.

अजनी (नागपूर) ते पुणे दरम्यान वंदे भारत ट्रेन सेवेची सुरूवात या दोन शहरांदरम्यान तसेच मार्गावरील इतर शहरांमध्ये काम, व्यवसाय, शिक्षण आणि पर्यटनासाठी प्रवास करणाऱ्या मोठ्या संख्येने प्रवाशांना मोठा लाभ होणार आहे. ही सेवा व्यावसायिक, विद्यार्थी, नोकरदार वर्ग तसेच नियमित प्रवास करणारे आणि विशेष दौर्यावर जाणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे. या सेवेच्या माध्यमातून पर्यटनाला चालना मिळणार असून व्यापार व उद्योगांसाठी नव्या संधीही निर्माण होतील.

## या ट्रेन पुढीलप्रमाणे आहेत : अजनी (नागपूर) – पुणे वंदे भारत, बेंगळूरू – बेळगावी वंदे भारत आणि कटडा – अमृतसर वंदे भारत एक्सप्रेस






अजनी (नागपूर) – पुणे वंदे भारत एक्सप्रेस ही आतापर्यंतची सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत ट्रेन असून ती ८८१ किमी अंतर कापणार आहे. ही महाराष्ट्रातील १२वी वंदे भारत गाडी असून वर्धा- अकोला- शेगाव- भुसावळ- जळगाव- मनमाड आणि पुणतांबा ते दौंड दरम्यानच्या भागात धावणारी पहिली वंदे भारत ट्रेन आहे. नागपूर ते पुणे दरम्यान धावणारी ही सर्वात वेगवान ट्रेन ठरणार असून तिचा सरासरी वेग ७३ किमी प्रतितास असेल आणि ती मार्गामध्ये १० स्थानकांवर थांबेल.

ही सेवा भारताच्या आधुनिक रेल्वे प्रवासातील प्रगतीचे प्रतीक असून प्रवाशांना अधिक जलद, आरामदायक प्रवासाचा अनुभव देत आहे. तसेच, देशाच्या कोपऱ्याकोपऱ्यापर्यंत सेवा पोहोचवण्याच्या रेल्वेच्या वचनबद्धतेचे हे उत्तम उदाहरण आहे.

पुणे- अजनी (नागपूर)- पुणे वंदे भारत एक्सप्रेसच्या नियमित सेवेची माहिती खालीलप्रमाणे आहे:

ट्रेन क्रमांक २६१०१ पुणे – अजनी वंदे भारत एक्सप्रेस ११.०८.२०२५ पासून दर आठवड्यात ६ दिवस (मंगळवार वगळता) पुणे स्टेशनवरून सकाळी ०६.२५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी सायंकाळी १८.२५ वाजता अजनी येथे पोहोचेल.

ट्रेन क्रमांक २६१०२ अजनी – पुणे वंदे भारत एक्सप्रेस १२.०८.२०२५ पासून दर आठवड्यात ६ दिवस (सोमवार वगळता) अजनी स्टेशनवरून सकाळी ०९.५० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री २१.५० वाजता पुणे येथे पोहोचेल.

थांबे – वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहमदनगर आणि दौंड कॉर्ड लाईन.

संरचना – ८ कोच ज्यामध्ये १ एक्झिक्युटिव्ह चेअर कार (EC) आणि ७ चेअर कार (CC) यांचा समावेश आहे, ज्यामध्ये एकूण ५३० प्रवासी बसू शकतात (EC कोचमध्ये ५२ जागा, ५ सीसी कोचमध्ये प्रत्येकी ७८ जागा आणि लोको पायलटच्या कोचला जोडलेल्या २ सीसी कोचमध्ये प्रत्येकी ४४ जागा).

या गाड्यांच्या सविस्तर वेळापत्रक व थांब्यांसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

या कार्यक्रमात मा. पंतप्रधान केएसआर बेंगलूरू – बेळगावी वंदे भारत एक्सप्रेस आणि श्री माता वैष्णोदेवी कटड़ा – अमृतसर वंदे भारत एक्सप्रेसलाही हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करतील.

सध्या देशात ७२ वंदे भारत ट्रेन २४ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये धावत असून, या ट्रेनद्वारे प्रवाशांना सुरक्षित, आरामदायक आणि जलद प्रवासासाठी एकूण १४४ सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आगामी ३ वर्षांत भारतीय रेल्वे २०० पेक्षा अधिक वंदे भारत ट्रेन सुरू करण्याचा मानस ठेवत आहे.

'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत तयार झालेली ही वंदे भारत ट्रेन, भारताच्या प्रगत तंत्रज्ञान व आत्मनिर्भरतेच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. या ट्रेनचा शुभारंभ महाराष्ट्राला नवकल्पना व कनेक्टिव्हिटीचे केंद्र म्हणून अधिक बळकट करेल आणि प्रदेशाच्या सर्वांगीण विकासास चालना देईल.

हा कार्यक्रम 'एक भारत – जोडलेला भारत' या सरकारच्या दूरदृष्टीचा प्रतिबिंब आहे, ज्यामध्ये वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन आधुनिक रेल्वे पायाभूत सुविधांचा एक महत्त्वपूर्ण आधारस्तंभ ठरत आहेत.

### वंदे भारत ट्रेनचे खास वैशिष्ट्ये – प्रवासी सुविधा

**वातानुकूलित एसी:**
- सर्व डबे वातानुकूलित प्रणालीने सुसज्ज

**स्वयंचलित तापमान नियंत्रण:**
- डब्यातील गर्दीच्या प्रमाणानुसार तापमान आपोआप समायोजित

**बसण्याची व्यवस्था:**
- लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सोयीस्कर बसण्याची रचना (एर्गोनॉमिक डिझाइन)
- **लाइटिंग सिस्टिम :** सर्व डब्यांमध्ये एलईडी व सौम्य लाइटिंग
- **दरवाजे:** सर्व डब्यांमध्ये स्वयंचलित स्लायडिंग दरवाजे
- **खिडक्या:** निसर्गदृश्य पाहण्यासाठी मोठ्या पॅनोरामिक खिडक्या
- **शौचालये:** बायो -व्हॅक्यूम तंत्रज्ञानयुक्त स्वच्छ व आधुनिक शौचालये

**वंदे भारत ट्रेनच्या संरक्षा सुविधा**
- **आग सुरक्षा:** आगीची वेळेवर सूचना व विझवण्याची यंत्रणा
- **सीसीटीव्ही निगराणी:** संपूर्ण ट्रेनमध्ये कॅमेऱ्याद्वारे सतत देखरेख
- **आपत्कालीन संवाद:** प्रत्येक डब्यात इंटरकॉम प्रणाली
- **ब्रेक प्रणाली:** ३०% पर्यंत उर्जा वाचवणारी पुनरुउत्पादन ब्रेक प्रणाली
- **ड्युअल सस्पेन्शन प्रणाली:** जास्त वेगातही आरामदायक प्रवास सुनिश्चित

# विश्वेश्वरय्याचा वर्धापन दिन वृक्षारोपणाने साजरा

**औसा/प्रतिनिधी :** तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचा दिनांक ०८ ऑगस्ट २०२५ रोजी १७ वा वर्धापन दिन विश्वेश्वर शैक्षणिक संकुलात महाविद्यालयाच्या परिसरात संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे व सहसचिव महादेव खिचडे यांच्या शुभहस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य गोपाळ दंडिमे, विभागप्रमुख प्रविण साबदे, रेवणसिध्द बुक्का, अंकुश बिडवे, मंगेश बिडवे, संदेश माडे, अब्दुल समद काझी, अजित लोकरे, ब्ल्यु बर्ड ज्युनिअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर यांच्या उपस्थितीत वृक्षारोपन करून साजरा करण्यात आला.





विश्वेश्वरय्या इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाने सन २००८ स्थापनेपासूनच लातूर पॅटर्नसारख्या शिक्षणाच्या पंढरीत विविध क्षेत्रात आपले नावलौकीक मिळवून लातूर पॅटर्नमध्ये आपले वेगळेपण जपले. शिक्षणाच्या चळवळीने अविरतपणे कार्य करून महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे एक्सेलन्ट नामांकन मिळविले. महाविद्यालयाने आपल्या अध्यापनात सातत्य ठेऊन महाविद्यालयाचा निकाल ९५ टक्केपेक्षा अधिक ठेवला. तसेच तंत्रशिक्षणातील सर्वोच्च एन.बी.ए. मानांकन दोन वेळेस प्राप्त केले. विविध क्रिडा, तांत्रीक स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. आर्थिकदृष्टया दुर्बल, गरीब, गरजू विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे मोफत शिक्षण दिले. आज महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील कंपनीमध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. सामाजिक क्षेत्रातही महाविद्यालयाने आपले योगदान दिले आहे. या १७ वर्षाच्या महाविद्यालयाच्या प्रवासात अनेक राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तीमत्वानी भेटी दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने शैक्षणिक प्रगतीचा आलेख वाढवला आहे. हेच महाविद्यालयाच्या यशाचे गमक असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी सांगीतले.

या वृक्षारोपनास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

# दयानंद शिक्षण संस्थेत पदवी प्रदान कार्यक्रम उत्साहात साजरा




**लातूर/प्रतिनिधी :** सध्याच्या परिस्थितीत शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार रुजविणे ही काळाची अत्यंत महत्वाची गरज आहे, असे प्रतिपादन दिल्ली येथील संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी यांनी गुरुवारी येथे बोलताना केले. दयानंद शिक्षण संस्थेअंतर्गत असणाऱ्या विविध महाविद्यालयाच्या वतीने २०२३-२४ साली उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवार, ७ ऑगस्ट २०२५ रोजी पदवी प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी होते. यावेळी मंचावर संस्था उपाध्यक्ष ललितभाई शाह, सचिव रमेश बियाणी, सहसचिव श्रीकांत उटगे, सदस्य दीनानाथ भुतडा, बालकिशन बांगड, सतिषचंद्र चापसी, उमाकांत केराळे, हरिकिशन मालू, विशाल अग्रवाल, डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ. जयप्रकाश दरगड, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ. पूनम नाथानी, प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते, प्राचार्य डॉ. वाजेद चाऊस, उपप्रचार्य डॉ. अंजली जोशी आदींची उपस्थिती होती. यावेळी २०२३-२४ साली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कुलगुरू डॉ. वरखेडी यांचा परिचय प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी करून दिला. यावेळी बोलताना डॉ. श्रीनिवास वरखेडी म्हणाले, सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत अनेक आव्हाने आहेत. एआयच्या नव्या जगात तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो आहे. मात्र एआय कधीच शिक्षकांची भूमिका निभावू शकत नाही. शिक्षकांनी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. मात्र, हे सगळं करताना विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच संस्कार रुजविण्याची गरज आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. पूनम नाथानी तर शेवटी आभार प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते यांनी मानले.

## स्वयंभु बहना ..

रे नात्याच्या बंधना
पारखाकरे जवाना
भेटणार कधी ताई
कोणत्यारक्षाबंधना

अंतर भेटीत पडले
जागृत सदा वेदना
सण गं सण वाटेना
दिस जाई सुनासुना

नाही ते ओवाळणे
काजळी निरांजना
काळजी भगिनीची
उदास छळते मना

मनगट सुने सुने ते
डोळ्यांत फुटेपान्हा
वाट पाहते द्रौपदी
कुठे हरवला कान्हा

ताईडीच्या घराकडे
जा रे श्रावण घना
वर्षाव कर स्नेहाचा
बरस पिवळ्या उना

समर्थ उभा ठाकलो
गं देशाच्या संरक्षणा
तू स्वयंभू बनावेस
आत्म निर्भर बहना

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यासाठी लातूर जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन

**लातूर/प्रतिनिधी :** अभय यावलकर समितीच्या शिफारशी लागू करा, किमान वेतनातील ३५ महिन्याचा वाढीव फरक बिल अदा करावे, किमान वेतनाची कमिटी बसवून वेतनाचे नवीन दर लागू करावे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी असणारी उत्पन्न आणि वसुलीची अट रद्द करावी या अन्य मागण्यासाठी महाराट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाच्या वतीने आज ८ ऑगस्ट रोजी पासून लातूर जिल्हा परिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले आहे. ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष हणमंत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री फडणवीस हे लातूर दौऱ्यावर येत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या या धरणे आंदोलनाला महत्व आले आहे. या आंदोलनात महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष कॉ. हणमंत कांबळे, जिल्हा सचिव कॉ. रामकिसन कुंटेवाड, मार्गदर्शक कॉ. ज्ञानदेव पवार, सुरेश काटे, रेणापूर, भागवत सूर्यवंशी औसा, कालिदास कांबळे, दिलीप पांचाळ जळकोट, बळीराम गिरी औसा आदिसह जिल्हातील ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

## वीज बंद निवेदन

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

३३/११ केव्ही आर्वी, ३३/११ केव्ही OPH व ३३/११ केव्ही MIDC अतिउच्च दाब उपकेंद्र, लातूर येथील तातडीची दुरुस्ती व देखभाल या कामाकरिता **दि.10.08.2025 ते 31.08.2025** पर्यंत रोजी **स.०९:०० ते सा. ०६:००** या दरम्यान वीज पुरवठा बंद विविध फिडर वर विविध वेळेत बंद राहील.

| अ.क्र. | line Permit चा दिवस | line Permit चा वेळ | फिडर चे नाव | बंद असलेला भाग / नगर / कॉलनी / सोसायटी |
|---|---|---|---|---|
| १. | १०.०८.२०२५ | स.०९:०० ते सा. ०६:०० | ११ केव्ही एन दत्ता | नवजीवन टायर्स भाग, स्वामी विवेकानंद कॉलेज भाग,गंगा पाईप्स भाग, लोकमत, पी.व्ही.आर भाग, MIDC उद्योग मित्र, ५ नं. पोलीस चौकी भाग इत्यादी |
| २. | १७.०८.२०२५ | स.०९:०० ते सा. ०६:०० | ११ केव्ही गांधी चौक | लोखंड गल्ली, सराफ लाईन, कामदार रोड, ग्रेन मार्केट, गांधी चौक, आझाद चौक, बस स्टँड समोरील भाग, चंद्र नगर, भुई गल्ली, बलेपिर गल्ली, झिंगणअप्पा गल्ली, नावंदर, मच्छी मार्केट, दयाराम रोड, काँग्रेस भवन ई., खंडोबा गल्ली, उस्मानपुरा, हमाल गल्ली, पोचमा गल्ली, राजट्टे गल्ली |
| ३. | २४.०८.२०२५ | स.०९:०० ते सा. ०६:०० | ११ केव्ही राधे राधे | १ नं. चौक ते कीर्ती चौक उजवी बाजू, कलंत्री दाल मिल भाग, अरोमा हॉटेल भाग, यशवंत पेपर भाग, पाटणकर डीपी, १ नं. चौक, बगीरा फॅक्टरी भाग |
| ४. | ३१.०८.२०२५ | स.०९:०० ते सा. ०६:०० | ११ केव्ही तंत्रनिकेतन | जिजामाता शाळा परिसर, PVR पाठीमागील भाग, MIDC कॉलनी, MIDC भाग, हडको परिसर, आरती व मयूर डीपी, पतंजली जवळील भाग, महिला तंत्रनिकेतन कॉलेज |

पीआरओ - ९९/२०२५-२६/दि.०७.०८.२०२५

**स्वा./- कार्यकारी अभियंता**
**म. रा. वि. वि. कं. म. लातूर विभाग**

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६